# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

**संपादक**
डॉ. अशोक ढवळे

**संपादक मंडळ**
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

**मुद्रक/प्रकाशक**
डॉ. अशोक ढवळे

**अक्षरजुळणी**
आत्माराम पडवळ

**मुखपृष्ठ व मांडणी**
केतन शिंदे

**व्यवस्थापक**
चंद्रकांत शिंदे

**प्रसिद्धी स्थळ**
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


# केंद्रीय कमिटीचे निवेदन

***मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कमिटीची बैठक २६ ते २९ ऑक्टोबर २०१४च्या दरम्यान नवी दिल्ली येथे झाली. त्यानंतर प्रसृत करण्यात आलेले निवेदन :***

## मनरेगावरील हल्ल्याचा प्रतिकार करा

मोदी सरकार ग्रामीण रोजगार हमी योजना कायद्याला मर्यादित करण्यासाठी पावले उचलत आहे. या कायद्याची अंमलबजावणी देशातील सर्वात मागासलेल्या २०० जिल्ह्यांपुरती मर्यादित करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.

तसेच सध्याचे मनुष्यबळाचा आणि यंत्राचा वापर याचे जे ६०:४० असे प्रमाण आहे त्यात बदल करून यंत्रावरील खर्च वाढवून ते ५१:४९ असे करण्याचे घाटत आहे. यामुळे या योजनेवर घातक परिणाम होऊन या योजनेचे संपूर्ण स्वरूपच बदलून जाण्याची शक्यता आहे. यामुळे मुळातच कमी असलेले कामाचे दिवस आणखीनच कमी होतील आणि यंत्र सामुग्रीचे प्रमाण वाढणे याचा अर्थ रोजगार हमीच्या कामात कंत्राटदारांना आपोआपच मोठ्या प्रमाणावर प्रवेश मिळेल. म्हणजेच मनरेगाचे रूपांतर रोजगार हमी कायद्यातून कंत्राटदार कमिशन हमी कायद्यात होईल.

या आधीच राज्यांना द्यावयाच्या रोजगारातील अंदाजपत्रकीय अनुदानात प्रचंड कपात करण्यात आलेली आहे. ज्यांना या योजनेखाली रोजगार देण्यात आलेला आहे त्यांच्या पगारासाठी ही अनुदानाची रक्कम आहे. उदाहरणार्थ, ग्रामीण रोजगार हमी योजनेची उत्कृष्ट अंमलबजावणी करणारे त्रिपुरा हे देशातील अव्वल क्रमांकाचे राज्य आहे. त्यांच्या रोजगारीचे अंदाजपत्रकीय मंजूर केलेले अनुदान आहे, ५.१५ कोटी मानवी दिवस. याचा अर्थ त्रिपुरासाठी वर्षाला १,४०६.९६ कोटी रुपये इतक्या रकमेचे केंद्रीय अनुदान असणार आहे. तथापि केंद्राने ह्या रकमेत ४७ टक्क्यांनी कपात करून ती रक्कम एकदम ६६० कोटी रुपयांवर आणून ठेवलेली आहे.

सध्या मनरेगा योजनेत कामाच्या दिवसांची राष्ट्रीय सरासरी फक्त ४५ आहे. त्या संख्येत वाढ करून ती संख्या १००पर्यंत म्हणजे त्या योजनेच्या अंतिम उद्दिष्टापर्यंत पोहोचविण्यासाठी काही सुधारणा गंभीरपणे करण्याऐवजी भाजपचे सरकार रोजगार हमी योजनेचे स्वरूपच बदलण्याच्या मागे लागले आहे.

मनरेगात कपात करण्याची उचलण्यात आलेली ही पावले म्हणजे ग्रामीण गरिबांच्या हक्कांवर आणि जीवनमानावर केलेला हा सरळसरळ हल्ला आहे असे केंद्रीय कमिटी मानते व सर्व लोकशाहीवादी शक्ती आणि जनसंघटनांना या बदलांना संयुक्तपणे विरोध करण्याचे आवाहन करते.

या मुद्यावर देशव्यापी मोहीम चालविण्याचा निर्णय केंद्रीय कमिटी घेत आहे. २६ नोव्हेंबरला देशभर निषेध दिन पाळण्यात येईल व दिल्लीतील त्या दिवशीच्या धरण्याचे नेतृत्व त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक सरकार हे करतील असा निर्णय घेण्यात आला.

## काळा पैसा

देशात दडवलेला काळा पैसा बाहेर काढू व ज्यांनी बेकायदेशीरपणे पैसा देशाबाहेर नेला आहे, त्यांच्यावर कडक कारवाई करू या मोदी सरकारच्या आश्वासनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या मुद्याबाबत निवडणूक मोहिमेच्या वेळेस भाजपने मारलेल्या बढाया पोकळच होत्या हे आता सिध्द होत आहे. मनमोहन सिंग सरकार प्रमाणेच नरेंद्र मोदी सरकारही या विदेशी खात्यांबाबत जी माहिती सरकारला मिळाली आहे ती प्रसिध्द करण्यास तयार नाही.

सरकारला मिळालेली माहिती सरकारने कोर्टापुढे सादर करावी असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्याचे केंद्रीय कमिटी स्वागत करीत आहे. या संदर्भात सरकारला माहिती द्यावयाची आहे की नाही अशीच शंका येत असून त्याला हा प्रश्न सोडवायचा आहे किंवा नाही असाच प्रश्न निर्माण होत आहे असा शेरा न्यायालयाने मारला.

## कामगार कायद्यांतील प्रतिगामी बदल

कामगार कायद्यांतील प्रतिगामी बदलांविरोधात केंद्रीय कामगार संघटनांनी सुरू केलेल्या संघर्षास केंद्रीय कमिटीने आपला संपूर्ण पाठिंबा व्यक्त केला आहे. या प्रस्तावित बदलांमुळे बहुसंख्य कामगार हे कामगार कायद्यांच्या कक्षेबाहेर राहणार आहेत.

## ६ डिसेंबर

बाबरी मशीद उद्ध्वस्त केलेल्या ६ डिसेंबर या दिवशी धर्मांधताविरोधी दिन आणि धार्मिक एकता दिन इतर डाव्या आणि लोकशाहीवादी शक्तींना बरोबर घेऊन साजरा करण्याचे आवाहन केंद्रीय कमिटी आपल्या सर्व शाखांना करीत आहे.

## पक्ष काँग्रेस

**पुनरावलोकन अहवाल मसुदा :** केंद्रीय कमिटीने पक्षाच्या राजकीय-डावपेचात्मक भूमिकेबाबतच्या पुनरावलोकन अहवालाच्या मसुद्यावर चर्चा केली. पक्षाची स्वतंत्र ताकद वाढण्याच्या आड ज्या कमतरता किंवा उणीवा आहेत त्या दूर केल्याने डाव्या लोकशाही आघाडीसाठी संघर्षासाठी आगेकूच करण्यासाठी पक्ष सक्षम होईल. त्या उणीवांचा आणि कमतरतांचा शोध घेण्याच्या उद्देशाने हा पुनरावलोकन अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

केंद्रीय कमिटीतील चर्चेच्या प्रकाशात पॉलिटब्यूरोने केलेल्या सूचना विचारात घेत अहवाल मान्यतेसाठी केंद्रीय समितीपुढे ठेवण्याचे अधिकार केंद्रीय समितीने पॉलिट ब्युरोला दिले.

पुढील केंद्रीय कमिटीची सभा जानेवारीत होईल. ज्यात राजकीय ठरावाचा मसुदाही ठेवण्यात येईल व २१व्या पक्ष काँग्रेसच्या अनुषंगाने हे दोन्ही दस्तऐवज पक्षामध्ये चर्चेसाठी खुले करण्यात येतील.

२१व्या पक्ष काँग्रेससाठी ७४९ प्रतिनिधींची निवड करण्याचा निर्णय केंद्रीय कमिटीने घेतला. राज्यवार प्रतिनिधी निवडीचा कोटा निश्चित करण्यात आला.

पक्ष काँग्रेसने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार ही पक्ष काँग्रेस संपल्यानंतर पक्षाचा संघटनात्मक प्लीनम घेण्याचा निर्णय घेतला.

**(अनुवाद : राजीव देशपांडे)**

# डिझेलच्या किंमतींवरचे सरकारी नियंत्रण रद्द

## पॉलिटब्यूरो निवेदन

डिझेलच्या किंमतींवरील सरकारी नियंत्रण रद्द करण्याच्या निर्णयाचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तीव्र निषेध करीत आहे. अत्यावश्यक वस्तूंच्या किंमतींवर डिझेलसारख्या इंधनाचा थेट परिणाम होतो. त्यामुळे अशा संवेदनशील पदार्थांच्या किंमतींवर नियंत्रण ठेवणे आणि त्या किंमतीचे नियमन करणे ही सरकारची जबाबदारी आहे. परंतु सरकार या जबाबदारीपासून पळ काढीत आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत क्रूड (कच्च्या) तेलाच्या किंमतीत प्रचंड घसरण झाल्यामुळे डिझेलच्या किंमती कमी करीत हे नियंत्रण रद्द केल्याची घोषणा करण्यात आलेली आहे. त्यामुळे डिझेलच्या किंमती, कमी झालेल्या किंमती आणि सरकारी किंमतीवरील रद्द करण्यात आलेले नियंत्रण यांचा संबंध जोडणे अत्यंत चुकीचे आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती सतत भडकत असतात, क्रूड तेलाच्या किंमतीतील वाढ ही प्रासंगिक होणाऱ्या किंमतीतील घटीपेक्षा कितीतरी जास्त असते. डिझेलच्या किंमतींवरील नियंत्रण रद्द झाल्यानंतरच्या काळात जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत क्रूड तेलाच्या किंमती वाढतील तेव्हा त्याच प्रमाणात भारतातील डिझेलच्या किंमतीही वाढतील.

मोदी सरकारने पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतींवर नियंत्रण ठेवणारी शासकीय किंमत नियंत्रण प्रणाली पूर्णत: मोडीत काढली आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अंतिम उत्पादनाची किंमत ठरविण्याची जी आयातीसान किंमतींची पद्धत आहे ती अंमलात आणण्यास सुरुवात केलेली आहे. ह्याचा उपयोग खासगी तेल कंपन्यांसह बाकी सर्व तेल कंपन्या यांनाच फक्त होणार आहे.

सरकारने पुन्हा शासकीय किंमत नियंत्रण प्रणाली चालू करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करीत आहे ज्यामुळे देशातील पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती कमी होतील.

### गॅसच्या किंमती

संपुआ सरकारच्या काळातील रंगराजन समितीचा गॅसच्या किंमती दुप्पट करण्याचा चुकीचा प्रस्ताव मोदी सरकारने स्विकारलेला नाही. मोदी सरकारने आत्ताच्या ४.२ डॉलर्स किंमतीवरून ५.६१ डॉलर्स किंमत वाढीला परवानगी दिलेली आहे. अर्थात खोल समुद्रात गॅसचा शोध घेतला गेला तर त्यासाठी बक्षिसी देण्याची आणि दर सहा महिन्यांनी किंमतींचे पुनरावलोकन करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे असे वृत्तांत प्रसिद्ध झालेले आहेत. त्यामुळे गॅसच्या किंमतीत आणखीन वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. गॅसच्या किंमती ठरविताना आंतरराष्ट्रीय पातळींवरील सरासरी किंमतींचा आधार घेता कामा नये तर देशातील गॅसच्या उत्पादनखर्चाचा संदर्भ घेत गॅसच्या किंमतीची निश्चिती केली पाहिजे, या मागणीचा पुनरुच्चार मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्यूरो करीत आहे. नाहीतर गॅस किंमतीतील वाढीमुळे केवळ गॅस उत्पादकांचाच फायदा होईल आणि जनतेला मात्र भाववाढीचा प्रचंड बोजा सहन करावा लागेल.

### अनुदानित एलपीजीबाबत

एलपीजी गॅस सिलेंडरचे अनुदान बँकांमार्फत रोखीने देण्याच्या योजनेमुळे एलपीजी गॅसच्या अनुदानाला देशातील मोठा विभाग मुकणार आहे. गाजावाजा करीत असलेल्या जनधन योजनेनंतरही सामान्य जनतेचा मोठा विभाग अजूनही बँकींग व्यवस्थेबाहेरच आहे.

**२० ऑक्टोबर २०१४**

# माकपचे सरचिटणीस प्रकाश करात यांची पत्रकार परिषद

केंद्रीय कमिटीतील चर्चा विचारात घेत राजकीय-डावपेचात्मक भूमिकेचे पुनरावलोकन करणारा सुधारित मसुदा तयार करण्याचे अधिकार केंद्रीय कमिटीने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोला दिले. पॉलिटब्यूरोने ठेवलेला हा प्रस्ताव केंद्रीय कमिटीने एकमताने स्विकारला असे प्रकाश करात यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. नवी दिल्ली येथील एकेजी भवन येथे भरगच्च पत्रकार परिषदेत ते बोलत होते. गेली पंचवीस वर्षे पक्षाने जी राजकीय-डावपेचात्मक भूमिका घेतलेली आहे त्या भूमिकेचे पुनरावलोकन करणे हा या चार दिवसांच्या केंद्रीय कमिटीच्या पुढील एक प्रमुख विषय होता. *केंद्रीय कमिटीत झालेल्या चर्चेनंतर पॉलिटब्यूरोची पुन्हा बैठक झाली व त्या बैठकीत केंद्रीय कमिटीत झालेल्या चर्चेच्या आधारे आम्ही सध्याचा मसुदा कशाप्रकारे सुधारित करता येईल याबद्दलच्या सर्वसंमत दृष्टीकोनाचा सर्वसंमत प्रस्ताव ठेवला. त्यात सात मुद्दे पुनरावलोकनासाठी समोर ठेवण्यात आले,* असे त्यांनी सांगितले.

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालांचा आढावा घेतल्यानंतर केंद्रीय कमिटीने पक्षाच्या राजकीय-डावपेचात्मक भूमिकेचे पुर्नपरीक्षण तसेच पक्षसंघटनेच्या कार्यपध्दतीकडे नव्याने लक्ष देण्याचे आणि जनतेतील कामाच्या परिस्थितीचे, जनसंघटनांच्या कामांचे परीक्षण आणि जनसंघटनेची कार्ये, याबरोबर उदारीकरणाचे समाजाच्या विविध घटकांवर आणि विभागांवर होत असलेले परिणाम याबाबत आढावा घेण्याचे आवाहन केले.

लवकरच होणाऱ्या पक्ष काँग्रेसच्या पार्श्वभूमीवर राजकीय-डावपेचात्मक भूमिकेचे पुनरावलोकन हा या सगळ्या अभ्यासाचा एक भाग आहे. पुनरावलोकन अहवालाचा सुधारित मसुदा जानेवारीतील केंद्रीय समितीच्या पुढील बैठकीसमोर ठेवला जाईल. तेथे त्यावर चर्चा होईल. त्यानंतर त्याला अंतिम स्वरूप दिले जाईल व पक्षाच्या शाखा पातळीवरील चर्चेसाठी पक्षाच्या प्रथेप्रमाणे राजकीय ठरावाच्या मसुद्यासह तो खुला करण्यात येईल. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष पाळत असलेल्या या लोकशाही प्रक्रियेवर भर देत प्रकाश करात यांनी प्रतिपादन केले, एकदा हा मसुदा कार्यकर्त्यांसाठी खुला झाला की, *दहा लाख पक्ष सभासदांना या मसुद्यावर चर्चा करून सूचना करण्यास जानेवारी ते मार्च एवढा कालावधी मिळेल.* यात काहीच वेगळे नसल्याचे अधोरेखित करत ही तर आमच्या पक्षातील पक्षांतर्गत लोकशाही पध्दतच असल्याचे त्यांनी सांगितले.

पक्ष हा आढावा का घेत आहे? या प्रश्नावर प्रकाश करात म्हणाले, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्वतंत्रपणे वाढ होत नसल्याने पक्ष त्याबाबतीत अजिबात समाधानी नव्हता. तसेच, *जालंधरपासून आम्ही पर्याय म्हणून डावी लोकशाही आघाडी स्थापन करण्याबाबत बोलत आहोत पण त्याबाबत काही भरीव घडलेले नाही.* या दोन गोष्टींवर आम्ही आमच्या राजकीय भूमिकेच्या चिकित्सक परीक्षणात भर दिला आहे. पण अशा पध्दतीने चर्चा घडवून आणण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. १९९६च्या निवडणूक निकालांनतरही हा राजकीय-डावपेचात्मक भूमिकेच्या पुनरावलोकनाचा मुद्दा उपस्थित झाला होता. पण अनेक वेगवेगळ्या कारणांमुळे त्या वेळेस हे काम होऊ शकले नाही.

पुनरावलोकनाच्या ह्या कामासाठी केवळ निवडणुकीतील पीछेहाट हे काही एकमेव कारण नसल्याचे प्रकाश करात यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, *आम्ही पक्षाचा विकास आणि पक्षाच्या वाढीची ताकद या संदर्भात अजिबात समाधानी नाही.*

ह्या आढाव्यात १९९१ पासूनच्या भूमिकांबाबतचेच पुनरावलोकन का करण्यात आले आहे? या प्रश्नाला उत्तर देताना प्रकाश करात म्हणाले, *उदारीकरण आणि नवउदारवादी धोरणे अंमलात आणण्याची प्रक्रिया १९९१ पासून चालू करण्यात आली. सोव्हिएत युनियनच्या पतनामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिस्थितीत १९९१मध्येच बदल घडून येऊ लागला होता. भाजप आणि इतर धर्मांध शक्तींना १९९१ पासूनच बळ मिळू लागले होते.* त्याबरोबर त्यांनी हेही स्पष्ट केले की पक्षाच्या राजकीय-डावपेचात्मक भूमिकेतील प्रत्येक गोष्टच चुकीची होती असे नाही. बऱ्याच प्रमाणात ती बरोबरच आहे पण त्यातील नेमक्या त्रुटींचा आम्ही शोध घेत आहोत.

पक्ष काँग्रेसचा कार्यक्रम अतिशय भरगच्च आहे व त्यामुळे संघटनात्मक बाबींवर चर्चेला त्यात योग्य न्याय देता येणार नसल्याने संघटनात्मक मुद्यांवर पक्ष काँग्रेसमध्ये चर्चा होणार नसल्याचे त्यांनी सांगितले व त्यासाठी पक्ष काँग्रेसनंतर काही महिन्यातच वेगळे खास प्लीनम घेण्याचा व त्या प्लीनमसाठीची मार्गदर्शक तत्वे पक्ष काँग्रेसने द्यावीत असा निर्णय झाल्याचेही त्यांनी सांगितले.

आज भाजप आपल्या स्वत:च्या ताकदीवर केंद्रात सत्तेवर आलेला आहे आणि अशा या नवीन राजकीय परिस्थितीतही समाजातील विविध स्तरांनी पक्ष घेत असलेल्या राजकीय-डावपेचात्मक आढाव्याबाबत मोठी उत्सुकता दाखविली या बाबत त्यांनी आनंद व्यक्त केला. केंद्रीय कमिटीत आणि पॉलिटब्यूरोमध्ये या आढाव्यावरून मतभेद असल्याचे वृत्तांत प्रकाश करात यांनी नाकारले व सांगितले की, पॉलिटब्यूरो सभासदांकडून आलेल्या एकूण सात निवेदनांवर पॉलिटब्यूरोत चर्चा करण्यात आली. पॉलिटब्यूरोने तयार केलेल्या अहवालाबाबत जर कोणाचा विरोधी दृष्टीकोन असेल तर त्या सभासदाला केंद्रीय कमिटीसमोर तो मांडता येईल व तो पर्यायी मसुदा सादर केला आहे असे मानले जाईल असे प्रकाश करात यांनी सांगितले व ते म्हणाले, आमच्याकडे असा कोणताही पर्यायी मसुदा आलेला नाही.

प.बंगालमध्ये अगर इतरत्रही काँग्रेसबरोबर कोणत्याही प्रकारची युती अथवा सहकार्य करण्यात येणार नसल्याचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस प्रकाश करात यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना नि:संदिग्धपणे सांगितले. *हा काही पक्षात चर्चा करण्यासारखा मुद्दाच नाही* असे सांगत प्रकाश करात यांनी असेही सांगितले की, *केंद्रातील भाजप सरकारच्या आणि विशेषत: आरएसएसच्या नेतृत्वाखालील हिंदुत्ववादी शक्तींच्या विरोधातील संघर्षात सर्व धर्मनिरपेक्ष शक्तींबरोबर आम्ही सहकार्य करू.*

आपली स्वतंत्र ताकद वाढवण्यावर जरी पक्षाचा भर असला तरी डाव्यांची एकता अधिक मजबूत करण्यासाठीही आम्ही कटिबध्द असल्याचे प्रकाश करात यांनी प्रतिपादन केले. त्या अनुषंगाने १ नोव्हेंबरला दिल्लीत बैठक आयोजित करण्यात आलेली आहे ज्यात सीपीआय(एम), सीपीआय, आरएसपी आणि एआयएफबी या डाव्या पक्षांव्यतिरिक्त सीपीआय (एमएल)-लिबरेशन आणि एसयुसीआय(कम्युनिस्ट) हेही डावे पक्ष सामील होणार आहेत. या सभेत संयुक्त मंचाबाबत व समान मुद्यांवरील मोहिमेसंदर्भात चर्चा करण्यात येईल.

**(अनुवाद : राजीव देशपांडे)**

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४
# कळवणमधून जे. पी. गावीत यांचा प्रेरणादायक विजय

**विजय पाटील**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत नाशिक जिल्ह्यातील कळवण मतदारसंघातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार व राज्य सचिवमंडळ सदस्य जे. पी. गावीत हे रोमहर्षक लढतीत विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार व माजी मंत्री तसेच तापी खोरे महामंडळाचे अध्यक्ष असलेले ए. टी. पवार यांचा त्यांनी पराभव केला व २००९ मध्ये झालेल्या पराभवाचे उट्टे काढले. भाजप, शिवसेना, काँग्रेस व इतर उमेदवारांना आपली अनामत रक्कमही वाचवता आली नाही.

१९७८, १९८०, १९८५ व १९९० असा सलग चार वेळा व पुन्हा १९९९ व २००४ साली अशा एकूण सहा वेळा त्यांनी सुरगाणा मतदारसंघातून विजय मिळविला होता. २००९ साली महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकांसाठी मतदारसंघांची पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार सुरगाणा व पेठ या तालुक्यांचा असलेला मतदारसंघ विभाजित होऊन सुरगाणा तालुका हा कळवणशी जोडला जाऊन नवीन कळवण मतदारसंघ अस्तित्वात आला व पेठ तालुका हा दिंडोरीला जोडून दिंडोरी मतदारसंघ झाला. सुरगाणा हा तालुका गेली अनेक वर्षे पक्षाचा बालेकिल्ला आहे. कळवण तालुक्यात मात्र काही वर्षांपासूनच किसान सभेचे काम सुरू झाले होते व पक्षसंघटना अतिशय कमजोर होती. दोन वर्षांत भक्कम पक्षसंघटना उभारणे ही अशक्य बाब असली तरी त्या निवडणुकीत मात्र पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कठोर परिश्रम घेऊनही पक्षाचे उमेदवार जे. पी. गावीत यांचा पराभव झाला होता. कळवणचे सात वेळा विधानसभेत निवडून आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार व माजी मंत्री ए. टी. पवार यांनी केलेल्या पैशाच्या अभूतपूर्व वापराच्या जोरावर व सुरगाणा तालुक्यातील माकपचे जुने प्रतिस्पर्धी तसेच भाजपचे विद्यमान खासदार व राष्ट्रवादीचे जुने नेते हरिश्चंद्र चव्हाण यांनी भाजप-सेनेची मते राष्ट्रवादीकडे वळवल्यामुळे ए. टी. पवारांचा तेव्हा विजय झाला होता.

गेल्या निवडणुकीत माकपच्या झालेल्या पराभवाची योग्य ती कारणमीमांसा करून व आपल्या कमजोऱ्यांवर मात करत, गेल्या पाच वर्षांत सुरगाणा-कळवण तालुक्यात केलेल्या पक्षसंघटनेच्या बांधणीमुळे व नियोजनबद्ध कामाच्या आखणीमुळे हा विजय प्राप्त झाला आहे.

या विजयामुळे जे. पी. गावीत हे सातव्यांदा विधानसभेमध्ये माकपचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व करणार आहेत. या अगोदर सुरगाणा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असताना त्यांनी सुरगाणा, पेठ व हरसूल-ठाणापाडा (त्र्यंबक) या भागातील केलेले भरघोस कार्य आता कळवण-सुरगाण्यासह जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत होऊन पक्ष संघटनेच्या कार्याला उभारी मिळेल. कळवण मतदारसंघाबरोबरच नाशिक जिल्ह्यातील पक्ष कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारा हा विजय आहे.

या विजयानिमित्त ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी कळवण शहरात विजयी मिरवणुकीचे व मतदारांचे आभार व्यक्त करण्यासाठी जाहीर सभेचे आयोजन पोलीस स्टेशनसमोरील मैदानावर करण्यात आले. या सभेला संबोधित करण्यासाठी माकपचे पॉलिटब्यूरो सदस्य खासदार सीताराम येचुरी व माकपचे राज्य सचिव डॉ. अशोक ढवळे उपस्थित होते.

३१ ऑक्टोबरला सकाळी ११ वाजल्यापासूनच कळवणमधील रस्ते कार्यकर्त्यांच्या खांद्यावर असलेल्या लाल बावट्यांच्या गर्दीने फुलून कळवण शहर लालेलाल झाले होते. कार्यकर्त्यांनी उधळलेल्या गुलालामुळे त्याला अधिकच लाली आली होती. दुपारी १ वाजता शहराच्या हद्दीबाहेर असलेल्या मानूर नाक्यापासून या विजयी मिरवणुकीला सुरुवात झाली. हजारो कार्यकर्त्यांचा समावेश असलेल्या या मिरवणुकीत एका उघड्या जीपमधून आ. जे. पी. गावीत कळवणमधील नागरिकांना अभिवादन करीत होते. अग्रभागी पारंपारिक आदिवासी पेहरावात नृत्य करणारे आदिवासी कलाकार, वाद्यांच्या तालावर नृत्य करणारे शेकडो कार्यकर्ते व हजारो कार्यकर्त्यांचा समावेश असलेली ही मिरवणूक शहरातील प्रमुख रस्त्यांवर फिरून पोलीस कार्यालयासमोरील मैदानावर विसर्जित झाली व तेथे एका भव्य सभेचे आयोजन करण्यात आले.

सभेच्या अध्यक्षस्थानी शेतकरी संघटनेचे कळवण तालुक्याचे नेते व वसंतदादा सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष शांताराम जाधव हे होते. सभेच्या सुरुवातीला स्थानिक कार्यकर्त्यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे व आमदार जे. पी. गावीत यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर या ऐतिहासिक विजयासाठी परिश्रम घेतलेल्या कळवण शहरातील प्रमुख कार्यकर्त्यांचा व मान्यवरांचा खासदार सीताराम येचुरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सभेचे प्रास्ताविक व संचालन माकपचे जिल्हा कमिटी सदस्य सावळीराम पवार यांनी केले.

या सभेला मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित असलेले खा. सीताराम येचुरी यांच्या उत्साहपूर्ण भाषणाने कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. यावेळी बोलताना त्यांनी कळवण मतदारसंघात मिळालेला हा विजय कार्यकर्त्यांच्या कठोर परिश्रमामुळे प्राप्त झाल्याचे सांगून कार्यकर्त्यांचे खास अभिनंदन केले. महाराष्ट्राच्या विधानसभेत माकपचा एकमेव उमेदवार निवडून आलेला असला तरी माकपचा एक आमदार म्हणजे १०० आमदारांचा आवाज असल्याचे त्यांनी सांगितले. कळवण मतदारसंघासह महाराष्ट्रातील सर्व श्रमिक जनतेची बाजू मांडण्याचे काम ते विधानसभेत करतीलच, पण त्याचबरोबर जनतेच्या रस्त्यावरच्या लढ्यांमध्येसुद्धा जनतेबरोबर असतील असे प्रतिपादन त्यांनी केले. जे. पी. गावीत हे जनतेचे नेते आहेत. जनतेच्या समस्यांची त्यांना अचूक जाण आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी ते कोणतीही कसूर ठेवणार नाहीत. आज त्यांचे अभिनंदन करीत असतानाच आपण आपले प्रश्न हेरून ते आमदार गावीतांमार्फत विधानसभेत मांडण्याचे कार्य करावे असे त्यांनी सांगेतले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ते पुढे म्हणाले की, आज केंद्रात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली व बड्या भांडवलदारांच्या मदतीने मूलतत्ववादी फॅसिस्ट सरकार सत्तेवर आले आहे आणि मोदींना निवडून आणण्यासाठी ज्यांनी अब्जावधी रुपये खर्च केले त्यांच्यासाठी मोदींनी काम करणे सुरू केले आहे. जनतेला लाभदायक ठरणाऱ्या योजना बंद करण्याचे व जनतेसाठी असलेली सबसिडी कमी करण्याचे मोदींचे उद्दिष्ट आहे. जनतेच्या मागण्यांकरिता मदत करण्याऐवजी ती मदत बंद करण्याचा घाट मोदी घालत

आहेत व तेच मोदींचे उद्दिष्ट आहे. जनतेला खोटी आश्वासने देऊन निवडणूक जिंकणाऱ्या मोदींनी जनतेची दिशाभूल केली आहे. मोदींच्या राज्यात जनतेच्या मागण्यांना काहीही किंमत नाही. अशा वातावरणात महाराष्ट्रातल्या या निवडणुका पार पडलेल्या आहेत. लोकसभेच्या निवडणुकांप्रमाणेच या निवडणुकांमध्येही पैसा, प्रसिद्धी व खोटी आश्वासने अशा मार्गांनी भाजपने सगळ्यात मोठा पक्ष म्हणून विजय मिळविलेला आहे. परंतु जनतेने बहुमत मात्र दिलेले नाही. खरं तर अल्पमतातलं हे लंगडं सरकार किती दिवस चालेल ही शंकाच आहे.

अशा या राजकीय संकटाच्या काळात माकपच्या आमदाराने जनतेचा आवाज जोरदारपणे विधानसभेत उठवावा. मला विश्वास आहे, गावीतांसारखा अभ्यासू व अनुभवी नेता ज्याला जनतेच्या प्रश्नांची जाण आहे हे कर्तव्य पार पाडेल.

जात-पात व धर्माच्या नावाने निवडून आलेल्या या सरकारच्या काळात, गावीतांना निवडून आणण्यासाठी कळवण मतदारसंघातील सर्व समाजातल्या जनतेने आपले योगदान दिले आहे. हाच एकोपा सामाजिक ऐक्यासाठी कायम ठेवणे गरजेचे आहे. आपण हे उद्दिष्ट ठेवाल असा मला विश्वास आहे. बहुमत नसलेल्या या लंगड्या सरकारला पळवायचे कामसुद्धा आपल्याला करावे लागेल असे सांगत, आमदार गावीत विधानसभेत हे काम आपल्या वतीने करतील असा विश्वास व्यक्त करत या ऐतिहासिक विजयाबद्दल त्यांनी कार्यकर्त्यांना क्रांतिकारी लाल सलाम केला.

या सभेला मार्गदर्शन करताना माकपचे राज्य सचिव डॉ. अशोक ढवळे यांनीही या विजयाबद्दल कार्यकर्त्यांचे हार्दिक अभिनंदन केले व सांगितले की, माकपच्या नेतृत्वाखाली व कॉम्रेड नाना मालुसरे आणि कॉम्रेड के. के. पवार यांच्या मार्गदर्शनाने गेली अनेक वर्षे नाशिक जिल्ह्यात केलेल्या अनेक ऐतिहासिक लढ्यांची पार्श्वभूमी या विजयाला आहे. देशात सर्वत्र डाव्या शक्तींवर प्रखर हल्ले होत असताना, आपल्या अनेक वर्षांच्या विकासाच्या कामामुळे कळवण-सुरगाणा मतदारसंघात हा ऐतिहासिक विजय मिळाल्याचे त्यांनी सांगितले. सहा वेळा विधानसभेचे प्रतिनिधित्व करणारे आ. गावीत आता सातव्यांदा विधानसभेत जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी जात आहेत. त्यांचे अभिनंदन करत असतानाच त्यांच्या यशाचे श्रेय लाल बावट्याच्या लढाऊ कार्यकर्त्यांना जाते असेही त्यांनी सांगितले.

आमदार असतानाच्या काळात गावीत यांनी सुरगाणा-पेठ-हरसूल-ठाणापाडा या आपल्या पूर्वीच्या मतदारसंघाचा सर्वांगीण असा विकास केला. मतदारसंघातील जनतेचे रस्ते, पाणी, वीज, आरोग्य असे मूलभूत प्रश्न सोडवत असतानाच मतदारसंघातील सामाजिक समस्यांसाठी सुद्धा भरघोस कार्य केले. विधवा पेन्शन, संजय गांधी निराधार योजना, अंध-अपंग, परित्यक्त्या व गरजूंसाठीच्या पेन्शन व इतर सहकारी योजना राबविण्यात आज सुरगाणा तालुका महाराष्ट्रात अग्रस्थानी आहे. या योजनेचा लाभ आज १८,०००पेक्षा जास्त लोकांना मिळत आहे असे नमूद करत आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की, पूर्वी आदिवासी समाजातील गरीब जोडप्यांचे विवाह आर्थिक हलाखीच्या परिस्थितीमुळे होऊ शकत नव्हते. त्यामुळे त्यांना आदिवासी समाजातील कोणत्याही सामाजिक कार्यक्रमांत व उत्सवात सहभागी होता येत नसे. आमदार गावीत यांनी अशा जोडप्यांसाठी सामुदायिक विवाहांचा सोहळा आपल्या मतदारसंघात अनेक वेळा राबवून हजारो तरुण-तरुणींचे विवाह लावले. स्वत:च्याही मुलांचे विवाह व अनेक प्रमुख कार्यकर्त्यांचे विवाह याच सोहळ्यात पार पडले. याच आदर्शवत कामाची पावती म्हणून त्या भागाने सहा वेळा त्यांना आमदार म्हणून विधानसभेत पाठवल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रासह देशभरात गाजलेली 'घरपोच धान्य योजना' ही संकल्पना आ. गावीत यांनी सर्वप्रथम आपल्या 'अलंगुण' या गावापासून सुरू केली. नंतर शासनाने ही योजना स्विकारली व सर्वदूर सुरू केली. वनाधिकार कायद्यांतर्गत मंजूर झालेली महाराष्ट्रातील सगळ्यात जास्त प्रकरणे सुरगाणा तालुक्यातील आहेत. उर्वरित सर्व वनजमीनधारकांना जमिनी मिळवून देण्याचे उद्दिष्ट लाल बावट्याचे आहे, असे सांगत त्यांनी आमदार गावीत यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कामाचेही कौतुक केले. गावीतांनी निर्माण केलेल्या शैक्षणिक संकुलात दरवर्षी हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन उच्च पदांवर नोकरी/व्यवसाय करीत आहेत असा उल्लेखही त्यांनी केला.

निष्ठावंत व लढाऊ कार्यकर्त्यांची फळी या विजयामागे असून, मजबूत पक्षसंघटना, किसान सभा, जनवादी महिला संघटना, डीवायएफआय व एसएफआयच्या कार्यकर्त्यांनी घेतलेल्या एकत्रित परिश्रमांनी मिळालेल्या या विजयामुळे सुरगाण्यासह कळवणचाही सर्वांगीण विकास होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

शेवटी आ. जे. पी. गावीत यांनी कळवण मतदारसंघातील कार्यकर्त्यांचे व मतदारांचे जाहीर आभार मानले व सांगितले की, मतदारसंघाच्या खऱ्याखुऱ्या विकासासाठी मतदारसंघातील जनतेने लाल बावट्यावर जो विश्वास टाकला आहे तो पूर्णत्वास नेण्यासाठी, जनतेच्या मतदारसंघातील विकासाच्या सूचनांप्रमाणे त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी अहोरात्र कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

कळवण मतदारसंघाच्या माजी आमदारांनी ठराविक लोकांच्या फायद्यासाठी फसव्या योजना राबवून जनतेची फसवणूक केली आहे. 'स्वत:च्या कुटुंबियांचा विकास आणि सर्व पदे घरातच' ही या आमदारांची कार्यपद्धती होती. अशा या घराणेशाहीला व फसवणुकीला जनतेने धडा शिकविला आहे. मागील निवडणुका जरी पैशाच्या जीवावर जिंकल्या असल्या तरी या वेळेला मात्र जनतेने त्यांचा सपाटून पराभव केला आहे. आजपर्यंत जनतेच्या साध्या कामांनासुद्धा कोणी वाली नव्हता, असे सांगून यापुढे जनतेच्या कामांना प्राधान्याने अग्रक्रम देऊन सुरगाण्यासारखाच कळवणचाही विकास केला जाईल असे आश्वासन त्यांनी कळवणवासियांना दिले. त्यात कोणताही भेदभाव नसेल असेही त्यांनी सांगितले. कळवणमधील शेतकरी, व्यापारी, सामान्य नागरिक व समाजातील सर्व नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन मतदारसंघात काम करण्याचे लाल बावट्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कळवणच्या जनतेला गैरसोईचे असणारे व पूर्वीच्या आमदारांनी ठराविक लोकांच्या फायद्यासाठी गावापासून लांब बांधलेल्या नवीन प्रशासकीय कार्यालयात कळवणमधील कोणतेही कार्यालय स्थलांतरित होणार नाही असे आश्वासन त्यांनी दिले. मतदारसंघाच्या विकासासाठी विधानसभेत प्रखर आवाज उठविला जाईल असेही आश्वासन त्यांनी शेवटी दिले.

या सभेला माकपचे राज्य कमिटी सदस्य किसन गुजर व हेमंत वाघेरे, जिल्हा सचिवमंडळ सदस्य सुनिल मालुसरे, जि.क. सदस्य सावळीराम पवार, लक्ष्मण गायकवाड, धनजी चौधरी, वसंत बागुल, आनंदा चव्हाण, विजय पाटील, सुरगाणा पं.स.चे सभापती उत्तम कडू, सुरगाणा पं.स.चे माजी सभापती रामजी गावीत, तालुका सेक्रेटरी हेमंत पाटील, जि.प. सदस्य प्रशांत देवरे व भिका राठोड, सुरगाणा पं.स.चे माजी उपसभापती इंद्रजित गावीत, निंबा पगार, धर्मेंद्र पगारीया, भरत शिंदे, संतोष देशमुख, विजय पवार, पवन मोरे, जगन माळी, दामूअण्णा, रशिद मामू, शिवाजी कुंभार, शाम शिंदे, धर्मराज शिंदे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

☐☐☐

# जागतिकीकरणाने सबका विकास?

सुलभा ब्रह्मे

गेली २०-२२ वर्षे भारतामध्ये जागतिकीकरणामुळे सर्वांपर्यंत विकास पोचणार असा भ्रामक प्रचार, राज्यकर्ते, माध्यमे, तथाकथित विचारवंत, शास्त्रज्ञ आदी सर्व करत आहेत. त्यामुळे जागतिकीकरण स्वागतार्ह आहे अशी अंधश्रद्धा जनमाणसात खोलवर रुजवली गेली आहे. १९९१ साली काँग्रेस सरकारने नाणेनिधीचे मोठे कर्ज घेऊन त्यांच्या अटीबरहुकूम **खाउजा** (खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण) धोरण स्वीकारले. बहुराष्ट्रीय व बड्या कंपन्याधार्जिण्या, या धोरणामुळे विस्थापन, बेकारी, महागाई वाढत जाऊन जनतेची ससेहोलपट वाढू लागली. तेव्हा स्वदेशीचा नारा देत भाजप आघाडीने १९९९ साली केंद्रीय सत्ता काबीज केली. परंतु सत्तेवर आल्यावर मात्र काँग्रेसपेक्षाही अधिक वेगाने खाउजा धोरण रेटणे चालू ठेवले. त्यामुळे २००४ सालच्या निवडणुकीत भाजप पराभूत होऊन काँग्रेस आघाडी डाव्या पक्षांच्या पाठिंब्याने सत्तेवर आली. डाव्या पक्षांमुळे रोजगार हमी, आदिवासी वनहक्क कायदा अशी काही लोकहितकारी धोरणे अंमलात आणली गेली. परिणामी २००९च्या निवडणुकीत काँग्रेस आघाडीने सत्ता टिकवू शकली. त्यानंतर काँग्रेस आघाडीने खाउजा धोरण रेटणे चालूच ठेवले.

## श्रमिकांचे खच्चीकरण

नवीन आर्थिक धोरणाखाली बड्या कंपन्यांना शासन मोठमोठे जंगलपट्टे बहाल करीत असून आदिवासी मोठ्या संख्येने निर्वाहसाधने गमावीत आहेत. नवी बंदरे, विमानतळ, पर्यटन केंद्रे, महामार्ग, कारखाने यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन शासन शेतकऱ्यांना देशोधडीला लावत आहे. विस्थापितांचे हे तांडे धरणे, महामार्ग, बंदरे, आलीशान इमारती, उड्डाणपूल अशा महाकाय बांधकाम प्रकल्पांकडे फेकले जात आहेत. ठेकेदारांच्या चाबकाखाली भरडले जात आहेत. असंघटित क्षेत्रातील असे लाखो कामकरी कमी वेतनात अमानुष पद्धतीने राबवले जात असून त्यांना कोणतेही कायदेशीर संरक्षण व संघटनांचा आधार नाही. असंघटित क्षेत्रातील कामगारांना युनियन्सचे बळ होते. परंतु कामगार कपात व खासगीकरण एवढ्या वेगाने रेटले जाते आहे की कामगार युनियन्सचे संप-लढे निष्प्रभ बनू लागले आहेत. कामगार-कर्मचारी मोठ्या संख्येने नोकरी गमावत असताना नव्या पिढीला नोकरी कोठून मिळणार ?

खाउजा धोरणाखाली कामगारवर्गाचे असे खच्चीकरण केले जाते आहे. कंत्राटी, हंगामी मजुरांच्या फौजा वाढवल्या जात आहेत. बेकार तरुणांचे तांडे विस्तारले जात आहेत. वाढत्या काळ्या धंद्यात त्यांना गुंतवून भणंग वर्ग वाढवला जात आहे. तसेच झटपट पैशाच्या मागे असलेले मध्यस्थ, दलाल, त्यांचे हस्तक, सेवक असे उपरे. अनुत्पादक, संधीसाधू थर वाढवले जात आहेत. धाकदपटशाचा वापर करून 'संरक्षण शुल्क' (Protection Money), कर्जवसुली, राहाती जागा खाली करून घेणे यासाठी खंडणी वसूल करण्याकरता राजकीय पुढारी, व्यापारी व कंत्राटदार बाळगत असलेल्या भणंगसेनांचा वेगाने विस्तार चालू आहे. भारतातील या भणंग भांडवलशाही अवस्थेमध्ये इलेक्ट्रॉनिक मीडियाचे मोहजाल, पैशाची धुंदी, शासकीय दमणयंत्रणा व गुंडसेना फोफावत आहेत. आर्थिक अंगाने जसा भणंग वर्ग वाढवला जात आहे तसाच राजकीय, सांस्कृतिक अंगानेही तो पोसला जात आहे. बेकार, दिशाहीन युवकांची दिशाभूल करून या तरुणांची झालेली लाकडे आपल्या चुलीत घालून जात-जमातवाद संघटना आपली पोटे भरत आहेत. जातीय दंगलीच्या होळीत सत्तेची पोळी भाजून घेत आहेत. वाढत्या बेकारीचा, आर्थिक अरिष्टाचा फायदा उठवून जात-जमातवादी शक्ती आपली ताकद वाढवत आहेत. साम्राज्यशहांना हे पोषकच आहे. म्हणून ते त्यास खतपाणीही घालत आहेत.

## खासगीकरण

नवीन आर्थिक धोरणाखाली सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण सरकारने सुरू केले. खनिज तेले, यंत्रसामुग्री, दूरसंचार आदी भरपूर नफा देणाऱ्या उद्योगांच्या समभागांची विक्री अत्यंत कमी किंमतीत मनमानी पद्धतीने करून २०-२५टक्के नफा देणारे उद्योग सरकार नष्ट करत आहे. मोठ्या नफ्याची हमी देऊन तेल, खाण, वीजनिर्मिती आदी नफेशीर क्षेत्रे खासगी कंपन्यांना बहाल करून सार्वजनिक उद्योग-सेवा डबघाईला आणल्या जात आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतात मुक्त विस्तार सुरू करून त्यांच्याशी स्पर्धेत टिकण्याच्या नावाने भारतीय उद्योग व सेवांमध्ये संगणकीकरण वेगाने रेटले जात आहे. परिणामी सार्वजनिक क्षेत्रातल्या १९० लाख नोकरांपैकी ५० लाखांची कपात संभवते. नवीन भरती तर जवळपास थांबलेलीच आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांची ताकद जगडव्याल आहे. तेव्हा टाटांसारखे बडे भारतीय उद्योगही बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर करार करून दुय्यमत्त्व स्वीकारत आहेत. अनेक सहयोगी कंपन्या उत्पादनाच्या कामाऐवजी निव्वळ जुळणीचे काम करत आहेत. मध्यस्थगिरी वाढते आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माऱ्याखाली, साबण, शीतपेये, कपडे पादत्राणांपासून टेलिफोन-मोटारीपर्यंत-भारतातले बडे उद्योग अडचणीत येत आहेत व त्यावर अवलंबून असलेले लहान उद्योग तसेच कारागिरी व गृहोद्योग बंद पडले आहेत. कामगार मोठ्या संख्येने बेकार होत आहेत.

## २०१४ मधील लोकसभा निवडणूक

जागतिकीकरणाच्या तेवीस वर्षांच्या जाचक अंमलामुळे जनतेतील असंतोष व वैफल्यभावना वाढत चालली होती. त्यात भर पडली ती जागतिक मंदीमुळे आर्थिक वाढीच्या दरातील घसरण, वाढती महागाई आणि खासगीकरणाच्या धोरणाखाली कोळसा, लोह, स्पेक्ट्रम आदी देशाची अमूल्य संपत्ती मनमानी पद्धतीने खासगी कंपन्यांना बहाल केल्यामुळे फोफावलेली भ्रष्टाचाराची मोठी प्रकरणे! त्यामुळे काँग्रेसविरोधी वातावरण तापू लागले. काँग्रेसच्या दिवाळखोरीचा भरपूर फायदा उठवत 'विकास' व 'सुशासन'याची गाजरे लटकवत भाजपचे नरेंद्र मोदी पंतप्रधानपदाच्या शर्यतीत उतरले. परदेशी-देशी बड्या कंपन्यांनी भरमसाठ पैसा पुरवून,

प्रसारमाध्यमांतून झंझावती प्रचार करून आणि संघ परिवाराने जात-जमातीचा एक्का वापरून मोदींना सत्तारूढ केले; काँग्रेसच्या गलथान कारभारामुळे महागाई भडकत आहे, मोदींच्या हातात सत्ता आल्यावर त्यांच्या तडफदार कार्यपद्धतीमुळे महागाई आटोक्यात येईल असा प्रचार मोदींनी निवडणूक काळात केला होता. महागाई का वाढते याची कल्पना नसल्याने जनतेची दिशाभूल झाली. पण मोदींची धोरणेही काँग्रेसप्रमाणेच देशी-विदेशी कंपन्यांचे नफे फुगवणारी व खाजगीकरण रेटून रॉकेल, गॅस, वीज, पाण्याचे दर वाढवणारी असल्याने महागाई वाढतच आहे.

याशिवाय मोदींच्या राजवटीखाली जागतिकीकरणाचे थैमान अधिकच संहारक स्वरूप धारण करत आहे. किरणोत्सारी अणुवीज प्रकल्प, महाकाय औद्योगिक पट्टे, नर्मदेवरील सरदार सरोवर धरणाच्या उंचीत मोठी वाढ, अवास्तव गंगा - कावेरी नदी जोड प्रकल्प अशा अनेक विनाशकारी प्रकल्पांमुळे लाखो भारतीय श्रमिक स्वदेशातच निर्वासित बनवले जाऊन भांडवलाच्या गुलामीच्या गाड्यास जुंपले जाणार आहेत. 'मोदींचे विकासाचे मॉडेल' म्हणजे साम्राज्यशाहीची हुकूमशाही! भाजपप्रणित बेगडी विकास भारतातील बहुविविधतेवर वरवंटा फिरवून भारतीयत्व नष्ट करू पाहत आहे. शेतकरी व आदिवासी यांचे जीवन उध्वस्त करून लाखो श्रमिकांना देशोधडीला लावून त्यांच्यापुढे 'शहरे' म्हणजे 'विकास' असे फसवे समीकरण मांडत आणि 'स्मार्ट सिटी'ची स्वप्ने रंगवत त्यांना भांडवलाच्या गुलामीत ओढले जाते आहे.

राष्ट्राभिमानाच्या पोकळ फुशारक्या मारत. स्वाभिमान सोडून, जपान व अमेरिका भेटीत, स्मार्ट सिटी, बुलेट ट्रेन यासाठी जपानी कंपन्या आणि अमेरिकेतील अनिवासी भारतीय व तेथील बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्यापुढे, मुक्त संचारासाठी, मोदी नतमस्तक! चीनच्या अध्यक्षांच्या भारत भेटीमध्ये विविध क्षेत्रांमधील गुंतवणुकीबाबत चर्चा झाली. चिनी यंत्र उद्योग व अन्य उद्योग भारतात सहयोगी उद्योग म्हणून गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. त्यामुळे भरपूर भांडवली गुंतवणूक, पण रोजगार मात्र नगण्य. स्मार्ट सिटी, रेल्वे, महामार्ग, वीजकेंद्रे, कारखाने यामध्ये गुंतवणू करायची म्हणजे मुबलक जमीन ताब्यात हवी. ही जमीन गावाची म्हणजे शेतकऱ्यांची किंवा जंगलातील म्हणजे आदिवासींची निर्वाह साधने आहेत. त्यांना बळजबरीने हुसकावल्याविना ती बहुराष्ट्रीय कंपन्यांना बहाल कशी करणार? अशा जमीन संपादनाच्या आड येत आहे. २००५ चा आदिवासी व वनवासी जमीन हक्क देणारा वनहक्क कायदा आणि सुधारित जमीन संपादन कायदा. तेव्हा हे दोन्ही कायदे 'सुधारण्याचा' (म्हणजे भारतीय जनतेचे कायदेशीर हक्क हिरावून घेण्याचा) मोदी शासनाचा इरादा आहे.

परकीय भांडवल गुंतवणुकीबाबत भारतामध्ये अनेक भ्रामक समजुती ठसवलेल्या आहेत. एक, भारतात भांडवलाचा तुटवडा आहे. हे खरे नाही. करचुकवेगिरी, लांड्यालबाड्या करून त्या पैशाला काळ्या पैशाचे रूप दिल्याने त्यातून उघड भांडवली गुंतवणूक करता येत नाही आणि हा पैसा जमिनीच्या व मालमत्तेच्या सट्टेबाजी व्यवहारात, रोखे बाजारात, विविध काळ्या धंद्यात, सोने-चांदी खरीदण्यात अडकला आहे किंवा परदेशाच्या गुप्त खात्यांमध्ये कुजवत ठेवला आहे. हा पैसा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाहून अधिक आहे असा अंदाज आहे.

दुसरा भ्रम म्हणजे परकीय गुंतवणुकीमुळे परकीय चलन उपलब्ध होते. भारतात नफा कमाईसाठी आलेले परकीय भांडवल व्याज, नफा, रॉयल्टी इ. मार्गे परदेशात नेले जाते. परिणामी काही वर्षांतच भांडवलाच्या आयातीपेक्षा परकीय चलनाची गळती वाढते आणि परकीय भांडवलामुळे परकीय चलनाचा नक्त पुरवठा वाढण्याऐवजी त्यामुळे परकीय चलनाची नक्त जावकच होते, आणि देश कर्जाच्या चिखलात खोलखोल रुतत जातो. रिझर्व बँकने परकीय कंपन्यांच्या १९९४-९५ ते १९९६-९७ या काळात केलेल्या २६८ कंपन्यांच्या अभ्यासातून हेच दिसून येते. या कंपन्यांनी या तीन वर्षात १५७ अब्ज रुपये परकीय चलन मिळविले व २०८ अब्ज रुपये आयात, नफा, रॉयल्टी इ. मार्गे परदेशी पाठवले. म्हणजे ऐन जावक ५१ अब्ज रुपयांची झाली. तीन वर्षातच ही रक्कम त्यांनी भारतात आणलेल्या भांडवलाच्या तिप्पट होती. यावरून परकीय भांडवलाद्वारा केवढी लूट केली जाते हे लक्षात येते.

तिसरा भ्रम, रोजगार निर्मिती होते. परकीय कंपन्या वापरतात ते तंत्रज्ञान अतिभांडवलप्रधान असल्याने रोजगार निर्मिती अल्पच होते. पण त्यासाठी शेतजमीन, जंगलजमीन बळकावली जाते. त्यामुळे शेतकरी, आदिवासी बेकार हेऊन नक्त रोजगारात घटच होते. शिवाय निसर्गसंपत्तीचा विध्वंस होतो तो वेगळाच! आलीशान शहरे, सुपरमहामार्ग, रेल्वेमार्ग, विमानतळ, बंदरे यासाठी लाखो हेक्टर जमीन संपादन केली जात आहे. प्रचंड बांधकामासाठी डोंगर भुईसपाट करून डबर आणि खडी, नद्या खरवडून वाळू, शेतजमीन उकरून विटा, जंगले समूळ नष्ट करून लाकूड पुरवठा आणि खाणकामातून कोळसा, लोह आदी खनिजसंपत्ती संपुष्टात आणली जात आहे. भूगर्भातले पाणी आटवून आणि शेतीचे पाणी पळवून 'स्मार्ट सिटी'ना पाणीपुरवठा, लाखोंचे विस्थापन असा प्रचंड विध्वंस करीत बड्या कंपन्यांच्या थैल्या भरणार, धनिकांचा ऐशआराम चैनचंगळ पोसली जाणार आहे. याला बिरुद मात्र सबका विकास!

□□□


## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांची वार्षिक वर्गणी

### जीवनमार्ग - रु. ३००, लोकलहर - रु. २००

### पीपल्स डेमॉक्रसी - रु. २५०, मार्क्सिस्ट - रु. १००

*आपल्या संपूर्ण पत्त्यासहित मनी ऑर्डर/बँक ड्राफ्टने वर्गणी पाठविण्याचे पत्ते*

व्यवस्थापक, जीवनमार्ग, जनशक्ती, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१३

इतर मुखपत्रे : मॅनेजर, लोकलहर, १५ तालकटोरा मार्ग, नवी दिल्ली - ११०००१

# दलित स्त्रियांची आत्मकथने : एक ऐतिहासिक दस्तऐवज

माया पंडित

व्यक्ती आणि समष्टी यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्यांवरती समष्टीच्या अंतरंगातून प्रकाशकिरण टाकून, तिचे चिकित्सक समीक्षण करणारी आणि त्याचवेळी व्यक्तीच्या खासगी आयुष्याच्या व 'स्व'रूपाच्या जडणघडणीचे आकलन इतरेजनांसमोर सार्वजनिक रीतीने मांडणारी कृती म्हणजे आत्मकथन होय. अशी कृती एकाच वेळी व्यक्ती आणि समष्टीच्या जडणघडणीत सातत्याने कार्यरत असणाऱ्या, बहुविध आणि परस्परावलंबी प्रक्रियांशी स्वत:च्या समूहाला आणि त्याचबरोबर वाचकालाही, जोडून घेत असते. एका दृष्टीने आत्मचरित्रे म्हणजे इतिहासाच्या विस्तीर्ण अवकाशातील एका विशिष्ट भूप्रदेशाचा स्थल-काल-संस्कृतीविशिष्ट असा जिवंत नकाशा उलगडणारे पथदीपच आहेत असे मानले पहिजे.

व्यक्तीव्यक्तींनी मिळून समाज बनतो असे वरकरणी जरी वाटत असले तरी ते खरे नाही. विशेषत: भारतासारख्या विविध जातीपातींनी बनलेल्या, माणसांचे जगणे निरनिराळ्या धर्मपंथरूढी परंपरांच्या पाशात करकचून बांधणाऱ्या आणि त्यांना उच्चनीचतेच्या स्तरांमध्ये कोंबून मारणाऱ्या देशात तर समाजाचा व्यक्ती विशिष्ट विचार अशक्यप्राय ठरतो. याचा अर्थ व्यक्ती इथे व्यक्ती म्हणून जगत नाहीत असा नाही; तर त्यांच्या व्यक्तीपणाला येणारा आकार हा व्यक्तीसापेक्ष बाबींच्या अनेक सामाजिक घटितांच्या बहुमेळी गुंफणीतून येत असतो आणि ती गुंफण ध्यानी घेतल्याशिवाय व्यक्तीचे व्यक्तीपण उमजत नाही, असा आहे. व्यक्तीची 'स्व'-रूपाची जाणीव आणि आत्मभान हे आंतरिक आणि बाह्य अशा अनेक घटकांमधून आकाराला येत असते. सामाजिकतेची संदर्भचौकट ही बाह्य मानली तर अंतर्मन, नेणीव आणि जाणीव घडणारी घटिते, मूल्यव्यवस्था भाषेपासून कौटुंबिकतेपर्यंत आणि लैंगिकतेपासून इच्छा-वासना-आकांक्षांपर्यंत स्थूल-सूक्ष्म रूपाने फैलावलेली असतात.

व्यक्ती आणि समाज यांच्यामधले नाते हे किती सूक्ष्मांतिसूक्ष्म जिवंत धाग्यांनी विणले गेलेले आहे, याबद्दल आता खूप लिहिले गेलेले आहे. मुद्दा असा की आपले जीवन हे सामाजिक आणि खाजगी असा अनेक व्यूहक्षेत्रांमध्ये वितरित होत असते. आणि जाणता-अजाणता त्या व्यूहक्षेत्रांमधील गुंतागुंत आत्मनिवेदनातून वाचकाला सामोरी येत असते. म्हणूनच आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीला ते मान्य असो वा नसो, पण त्यातून एका व्यामिश्र जीवनाचे दर्शन घडते हे निर्विवाद.

'भारतात आत्मकथात्मक लेखनपरंपरा नाही; भारतात लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांचे व्यवच्छेदक लक्षण सांगणे अवघड आहे; कारण त्यामधून निवेदनाच्या 'व्यक्ती' म्हणून जगलेल्या आणि खाजगी अनुभवांशी निगडित असलेल्या 'स्व'चे दिग्दर्शन होत नाही; भारतीयांचा कल 'स्व'च्या खाजगी जीवनातल्या गुंतागुंतीला वाचकांसमोर उलगडून मांडण्यापेक्षा अधिक 'स्व'च्या 'सार्वजनिक'अनुभवांना जाहीरपणे इतरांबरोबर वाटून घेण्याकडे असतो,' असे अनेक तज्ज्ञ मंडळींचं मत आहे. महात्मा गांधींचे सत्याचे प्रयोग हे त्याचे ठळक उदाहरण आहे. भारतात आत्मकथनात्मक साहित्याचा उदय उशीरा झाला आहे असेही काही लोक म्हणतात. कारण त्यांच्या मते इथल्या, भारतीय समाजाच्या आणि पाश्चात्य संस्कृतीच्या एकूण सांस्कृतिक जडणघडणीत फरक आहे. काही जणांनी याला आपली एक 'ऐतिहासिक उणीव' किंवा न्यून मानले आहे. कारण त्यांच्या मते आत्मकथनासाठी आत्मभान जागृत झालेली, 'स्व'ची प्रखर जाणीव बाळगणारी आणि आपल्या सामाजिक राजकीय अस्तित्वभानाने 'स्व' आणि 'इतर' यांच्या दरम्यानच्या अनुबंधांची, नात्यांची चिकित्सक मांडणी करणारी अशी व्यक्ती आवश्यक असते. आणि भारतात अशी व्यक्ती ब्रिटिश कालखंडापूर्वी, म्हणजे भांडवलशाहीच्या/साम्राज्यवादाच्या आगमनापूर्वी, अस्तित्वात आलेली नव्हती.

या युक्तीवादामध्ये तथ्य असेलही पण याची सत्यसत्यता ऐतिहासिक दृष्टीने तपासून पहायला हवी. कारण हे 'स्व'भान तुकारामात, बहिणाबाईत दिसते. तसेच ते ब्रिटिश कालखंडापूर्वीच्या अनेक मौखिक परंपरांमध्येही थोड्याफार फरकाने वेगळ्या रूपाचे दिसते. (उदाहरणार्थ 'जनी म्हणे'अशी मौखिक सही असणे) मुख्य मुद्दा असा की भारतात आत्मकथनात्मक लेखनपरंपरा नाही हे विधान तपासून पहायला हवे. भारतात आत्मकथनाच्या परंपरा पाश्चात्य आत्मकथनपरंपरांपेक्षा वेगळ्या आहेत असे मला वाटते.

जर असे असेल तर भारतात आत्मकथनात्मक लेखनाच्या परंपरा नेमक्या कोणत्या आहेत? आणि त्यांचा वेगळेपणा कशात आहे? आत्मकथन या सांस्कृतिक घटिताच्या नमनालाच घडाभर प्रश्न उपस्थित होतात. दलित स्त्रियांच्या आत्मकथनांकडे जाताना प्रथम या काही प्रश्नांची जाणीव मनात बाळगणे पूर्वतयारी म्हणून गरजेचे आहे. कारण या आत्मकथनांमधून आपल्याला वास्तवाकडे आणि परंपरेकडे पाहण्याचे ऐतिहासिक भान येते. किंबहुना ही आत्मचरित्रे म्हणजे या प्रश्नांना तावून सुलाखून घेण्याची एक ऐरण आहे असे मला वाटते. उदाहरणार्थ, जात, धर्म, वर्ग, लिंगभाव, पितृसत्ताक या सामाजिक घटितांमधून स्त्री पुरुषांचा 'स्व'भाव कसा घडतो? त्यांच्या उघड आणि छुप्या संकेतांमधून स्त्रियांचे खाजगी जीवन घरात आणि घराबाहेर कसे नियत होते? किंबहुना ब्राह्मण, शूद्र, शुद्रांतिशूद्र अशा सामाजिक उतरंडीच्या रचनेत त्यांच्या व्यक्तिमत्वांच्या जडणघडणी प्रस्थापितांच्या सत्तेला अनुकूल आणि अधिमान्यता देणाऱ्या होतील याची दक्षता प्रस्थापित संस्था-व्यवस्था कशा घेतात? त्यातून त्यांच्या लैंगिकतेचे कसे नियमन करतात? आणि महत्वाचे म्हणजे स्त्रियांमध्ये प्रतिकाराचे अंगार आणि आत्मभानाची स्फुल्लिंगे कोण चेतवितो? सभोवतालच्या सत्ताजालाचा त्या कशा प्रकारे प्रतिकार करतात? त्यांच्या कोणत्या अनुभवांमधून प्रतिकाराच्या उर्जा तयार होतात? आत्मनिवेदनातून हे प्रगटीकरण कसे होते? अशा साऱ्या प्रश्नांची एक महामालिकाच आपल्यासमोर तयार होते. यांची सर्व उत्तरे थोडक्यात देता आली नाहीत तरी काही मुद्दे अधिक तपशीलाने विचारात घेता येतील.

महाराष्ट्राबद्दल बोलायचे तर आत्मकथनांची नीट सलग परंपरा आपल्याला एकोणीसाव्या शतकापासून दिसते हे खरे आहे. आणि ही परंपरा स्त्रियांच्या आत्मकथनांबद्दल बोलायचे तर मजबूत आहे. दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचा विचार करताना मराठीतली स्त्री आत्मकथनात्मक लेखनाची परंपरा काय आहे. स्त्रियांनी आत्मचरित्रे का लिहिली? या आत्मचरित्रांनी नेमके स्त्रियांच्या कोणत्या जगांमधील जगण्याच्या अनुभवांचे दिग्दर्शन केलेले आहे? त्यातले आत्मभान आणि त्या परंपरेचे 'स्व'रूप दलित स्त्रियांनी आपल्या ऐतिहासिक जाणिवेतून कसे बदलले आहे? याचा थोडका आणि धावता विचार मी यापुढील विवेचनात करणार आहे. अर्थातच दलित स्त्रियांची आत्मकथने आणि दलित पुरुषांची आत्मकथने 'स्व'रूपाने भिन्न आहेत का, दलित स्त्रियांच्या आत्मभानाचे आविष्करण आणि अन्य भारतीय वा परकीय भाषांमधील स्त्रियांच्या तत्सम लेखनात काही साधर्म्य आणि फरक आहे का, त्यातील दलित स्त्री म्हणून जी

जाणीव आहे तिचे स्वरूप आणि राजकीय आकलन काय आहे; असेही प्रश्न उपस्थित होतात.

मराठीतले अगदी सुरुवातीचे आत्मकथात्मक निवेदन म्हणून काशीबाई कानिटकरांच्या 'माझे शिक्षण'चा विचार करावा लागेल. मीरा कोसंबी यांच्या मते हे मराठीतले पहिले आत्मकथन असावे, काशीबाईंच्या आत्मचरित्रात्मक लेखनाची रचना झाली ती आपल्या आयुष्यातील काही प्रसंग काशीबाईंनी सांगावेत असा आग्रह तरुण नातेवाईकांनी केला म्हणून. त्यामुळे हे आत्मकथन लिहिले गेले ते १९२१ ते १९४८ एवढ्या प्रदीर्घ काळात. काशीबाईंनी स्वत:बद्दल बोलताना शिक्षणाच्या आठवणी सांगाव्या हे महत्वाचे आहे. 'लेखन' हे देखील प्रस्थापितांच्या प्रतिकाराचे शस्त्र आहे ही जाणीव आली ती मुळात १९व्या शतकातल्या शिक्षणातूनच.

शिक्षण ही एक अद्भूत गोष्ट आहे आणि ती आपल्याला आपल्या जगाबद्दल बोलायचे सामर्थ्य देते, ही जाणीव जशी काशीबाईंच्या नव्या आत्मभानात दिसते तशी ती त्यांच्याच समकालीन रमाबाई रानडे यांच्याही आत्मकथनात दिसते. (आणि पुढे बेबी कांबळे आणि आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचा शिक्षणावरचा कटाक्ष आणि जोर, दलित आणि दलितेतर स्त्रियांच्या मधला एक समान दुवा आहे). महर्षि कर्वेंच्या पत्नी बाया कर्वे, सर मोरोपंत जोशी यांच्या पत्नी यशोदाबाई, काशीबाईंच्या बहीण पार्वतीबाई आठवले आणि लक्ष्मीबाई टिळक यांच्याही लेखनात शिक्षण हा त्यांच्या अनुभवांना एक मोठाच टप्पा आहे हे जाणवते.

मराठीतल्या या सुरुवातीच्या आत्मकथनांमागील प्रेरणा मात्र निरनिराळ्या आहेत. रमाबाई आणि यशोदाबाई आपल्या पतींचे गुणवर्णन करण्यासाठी आपापल्या आयुष्यातील काही आठवणी सांगतात. पार्वतीबाई शिक्षणाचा आणि समाजसेवेच्या क्षेत्रात विधवांनी उतरावे म्हणून आपल्या जीवनाच्या त्यांना प्रोत्साहित करणाऱ्या अशा काही भागांचा आढावा घेतात.

लक्ष्मीबाईंनी लिहिलेले आत्मचरित्र मराठीतले एक विलक्षण संचित आहे. त्यांनी ते लिहीले त्याचे कारण असे की त्यांच्या मुलाला रेव्हरंड टिळकांचे चरित्र लिहायचे होते आणि आपल्या आईने त्यांच्याबद्दलच्या आठवणी लिहिल्या तर त्यांचा उपयोग होईल, अशी त्याची धारणा होती. ते तर काही त्यांच्या हातून लिहून झाले नाही पण लक्ष्मीबाईंनी जे लिहिले त्यातून मात्र त्या काळच्या ब्राह्मण वर्गाची इतरांवरील मिरासदारी आणि अहंमन्यता, त्यांची सत्तावंत परकीयांच्या पायी लोळण घेण्याची क्षुद्र वृत्ती, त्यांच्या पितृसत्ताक व्यवहारातून स्त्रियांच्या वाट्याला येणारा कौटुंबिक हिंसाचार आणि दडपणूक, साम्राज्यवाद आणि इथले प्रस्थापित यांच्या सत्ताकारणात 'धर्मांतरण' या सांस्कृतिक राजकारणाचा वाटा, आणि मिशनरी वर्गाच्या अंतर्गत वाहणाऱ्या धार्मिक सत्ताकारणाचे साम्राज्यवादी आणि जातीय अंतरंग उलगडून दाखविण्याची हातोटी आणि या सर्व बाबींना एका ऐतिहासिक परिघात आणणारी विलक्षण. विनोदबुद्धी यांची जिवंत बेरीज आढळते. लक्ष्मीबाई सोडल्या तर या सर्व आत्मचरित्रांमधून या स्त्रिया स्वत:ला फारसे महत्व देत नाहीत. आपला पती आपल्यापेक्षा कितीतरी थोर आहे आणि त्याच्यासमोर आपण क:पदार्थ आहोत, स्वत:बद्दल कमीपणाची भावना त्यांच्या 'स्व'चे व्यवच्छेदक लक्षण आहे.

मराठी आत्मचरित्रांच्या परंपरेत विसाव्या शतकात उल्लेख करावा अशा विविध उच्चवर्णीय स्त्रियांच्या आत्मकथनांची मालिका आहे. उदाहरणार्थ, आनंदीबाई शिर्के यांचे 'सांजवात', काशीनाथ घाणेकरांच्या पत्नीचे, कांचन घाणेकरांचे 'मला काही सांगायचंय', हंसा वाडकर यांचे 'सांगत्ये ऐका', बालकवींच्या पत्नीचे 'आत्मकथन', मल्लिका अमर शेख यांचे 'मला उद्ध्वस्त व्हायचंय', ते सुनिता देशपांडे यांच्या 'आहे मनोहर तरी'पर्यंत अनेक. सुरुवातीची आत्मकथने बहुशा पतीकेंद्री होती तर ही आत्मकथने देखील एका वेगळ्या अर्थाने पतीक्रेंदीच आहेत. कारण सांजवातचा अपवाद वगळता त्यांचे स्वरूप प्रामुख्याने पतीसोबतच्या सहजीवनात सोसलेल्या दु:खांची वाचकांसमोर मांडलेली कैफियत असे आहे.

लक्ष्मीबाई टिळकांच्या, रमाबाईंच्या आत्मचरित्रांमध्ये त्यांच्या खाजगी जीवनाची कधी सडेतोड तर कधी सौम्य चिकित्सा काही प्रमाणात क्वचितच दिसते. त्यामानाने ही आत्मचरित्रे खूपच निर्भिड आहेत. कैफियतीच्या अंगाने मांडलेल्या या स्मृतिबंधांमध्ये दृग्गोचर होते ते विश्व मध्यमवर्गीय, उच्चवर्णीय आणि बऱ्यापैकी सुस्थित स्त्रियांचे आहे. कुटुंबात सोसलेल्या अडचणी, उंबरठ्यावर भंग पावलेली स्वप्ने, घरभिंतींनी बाहेरील दिशांचा केलेला संकोच, स्वत:ला मिळालेला दुय्यम दर्जा आणि पतीच्या/कुटुंबाच्या असमंजसपणामुळे सोसलेला शारिरीक आणि मानसिक त्रास....इत्यादी तथाकथित खाजगी बाबींबद्दल, बाबत ही आत्मचरित्रे पुरुषांच्या तुलनेत बरीच खुली मांडणी करतात. अर्थात म्हणून त्यांच्या लिखाणाचे महत्व कमी आहे असे नाही, कारण त्यातून मध्यमवर्गीय उच्चवर्णीय कुटुंबातल्या पितृसत्ताकतेचे आपले आकलन अनुभवविश्वांच्या स्तरावर वाढते.

पण त्याचबरोबर त्यांचे महत्व यासाठी आहे की त्यातून महाराष्ट्रातल्या स्त्रीमुक्ती चळवळीच्या स्त्री प्रश्नांच्या समजेचे, आकलनाचे आणि तिने अनुसरलेल्या मार्गाच्या मर्यादांचे ऐतिहासिक भान आपल्याला येते. कारण पितृसत्ताकता आणि तिचे अन्य वर्ग, जात, धर्म आणि भांडवली दमनयंत्रणाशी असलले संबंध, ज्यातून लैंगिकतेचे ढाचे प्रस्थापित होतात, आणि स्त्रियांमध्ये असमान सत्तासंबंधातल्या उतरंडी रचल्या जातात, त्याबाबत अनुभव आणि आकलनाच्या पातळीवर फारसे काही हाती लागत नाही. विसाव्या शतकातल्या या आत्मचरित्रांमध्ये स्त्रीवादी अभिनिवेष आणि प्रतिकारी जाणीव प्रत्ययाला येते खरी पण या जाणिवेची नजर आपल्या जातीय वास्तवाच्या सीमा ओलांडून गावकुसाबाहेरच्या अमानुष वास्तवात किंवा धार्मिक विद्वेषाच्या विखारी वातावरणात होरपळत घडत जाणाऱ्या बाईच्या जगण्याकडे क्वचितच गेलेली दिसते.

आधुनिकतेने जो बदल आणला त्यात स्त्रियांच्या दमनाचे नवे मार्ग तयार झाले पण त्याचबरोबर मध्यमवर्गीय स्त्रियांना दमनव्यवस्थांबरोबरच झगडा करण्याचे बळ मिळाले हेही खरे आहे. मात्र आपले प्रश्न हे जणू सर्व स्त्रियांचे प्रातिनिधिक आहेत असा एक समज तिथे दिसतो. आपणही धर्म-जात-वर्गाच्या, आधुनिकतेच्या, सामाजिक-आर्थिक पातळीवर सत्तावंत गटात आहेत आणि आपल्यापेक्षा खालच्या वर्गीय, जातीय इत्यादी पातळीवरील स्त्रियांच्या दमनाला आपलाही हातभार या न त्या प्रकारे, जाणता – अजाणता लागलेला असतो, अशी सत्तासंबंधांचे आणि स्वत:चे परखड विश्लेषण करणारी कठोर राजकीय जाणीव तेथे दिसत नाही. उदाहरणार्थ, मध्यमवर्गीय आणि उच्चजातीय कुटुंबातल्या पितृसत्ताकाचे वा हिंसाचाराचे, वा कायद्याचे विश्लेषण करताना दलित, कामगार, कष्टकरी, मुस्लिम, आदिवासी अशा अनेक प्रकारच्या स्त्रिया आहेत आणि त्यांच्या जगण्यात त्यांना सोसाव्या लागणाऱ्या हिंसाचाराशी या साऱ्या व्यवस्थांचा संबंध आणि आपले जगणे त्याच्याशी कुठेतरी जोडून पाहिले पाहिजे, अशी भूमिका अभावाने दिसते.

मग वाचकांच्या सार्वजनिक नजरेला उठून दिसतो तो त्यातील चमकदार 'परफॉरमन्स'. या परफॉरमन्समध्ये 'जात' नावाची काही गोष्ट असलीच तर ती आपल्याला लागू होत नाही. ती काहीतरी खालच्या समाजातल्या लोकांची बाब आहे, अशी समजूत दिसते. आपण जातीबितीच्या पलिकडे गेलेल्या आहोत; म्हणून त्यांचे जगणे जातींनी बांधलेले, जुनाट; आधुनिकतेचा स्पर्श

न झालेले आणि आपले आधुनिक, कारण आपण जातिबितीच्या पलिकडे कारण आपण आधुनिक! पण तरी देखील आपले जगणे मात्र सर्व स्त्रियांचे भगिनीभावाने प्रतिनिधित्व करणारे असा अभिनिवेश! मला या आत्मचरित्रांची निंदा वा चेष्टा मुळीच करायची नाही. त्यातून बाईच्या जगण्याचे येणारे आत्मभान काळाच्या त्या बिंदूवर महत्वाचे होते पण थोडे अपुरे, अप्पलपोटे आणि काही वेळा मतलबी होते असे मला वाटते. पण त्यांचे ऐतिहासिक महत्व म्हणून कमी होत नाही.

या 'वेगळे'पणाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला दलित स्त्रियांच्या आत्मचरित्रांकडे पहायला हवे. या आत्मचरित्रांमध्ये आपापल्या जातींच्या वेगळेपणाचा साजरा उत्सव या बायांनी मांडलेला नाही. हे पहिल्यांदा लक्षात घ्यायला हवे. ही आत्मचरित्रे एक प्रखर राजकीय जाणीव घेऊन आपल्याला सामोरी येतात. दलित पुरुषांनी लिहिलेली आत्मचरित्रे आणि दलित स्त्रियांची आत्मचरित्रे यात एक महत्वाचे साम्य आहे. त्यांची ही राजकीय जाणीव प्रस्थापित आणि प्रतिकारी अशा अनेक पातळ्यांवरच्या अनेक सत्ताकारणांचा सामना करते. पण मध्यमवर्गीय स्त्रियांनी लिहिलेल्या आणि दलित पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांमध्ये एक गोष्ट समान आहे. ती म्हणजे भारतीय वास्तवात दलित स्त्रीच्या लढाऊ आयुष्याचे आकलन करण्यात त्यांची राजकीय जाणीव कमी पडते.

लढाऊ दलित पुरुष आणि स्त्रीमुक्ती चळवळीच्या झुंझार स्त्रिया-दोघेही दलित स्त्रीचे कर्तृत्व नाही म्हटले तरी दृष्टीआड करतात. एकीकडे मध्यमवर्गीय नजरेचा कोतेपणा तर दुसरीकडे बाईला दुय्यम लेखणारी दलितांमधील पुरुषसत्ताकता! त्या पुरुषसत्ताकतेचे स्वरूप उच्चवर्णीय समाजातल्या पुरुषसत्ताकतेपेक्षा थोडे निराळे असले तरी दलित लेखकांचे आत्मभान पुरुषसत्ताकता नाकारत नाही. दलित पुरुष आत्मचरित्रांनी मराठीतल्या आत्मचरित्रलेखनाला नवे आयाम दिले हे खरे पण दलित बाईच्या शोषणाचे विविध ढाचे अंतर्बाह्य ओळखून त्याविरुद्ध उभ्या राहणाऱ्या दलित पुरुषाचे आत्मभान त्यात आलेले नाही, हेही खरे आहे. दलित पुरुषांनी देखील स्त्रियांचा विचार धर्म, वर्ग, जात, लिंगभाव या कोटींच्या संदर्भात, अर्थव्यवस्था आणि आधुनिकता यांच्या अक्षांवरती, आई म्हणून, बायको म्हणून, मैत्रीण म्हणून, नुसतीच बाई म्हणून आणि चळवळीतली खांद्याला खांदा लावून लढणारी सहकारी म्हणून तोकडाच केलेला आहे, याकडे मी आपले लक्ष वेधते.

सर्वात महत्वाचे म्हणजे 'दलित म्हणजे लढाऊ' हे राजकीय भान स्त्रियांच्यामध्ये जितक्या तीव्रतेने दिसते, तितके ते पुरुषांच्या आत्मचरित्रात दिसत नाही आणि स्त्रियांबरोबरच्या त्यांच्या -समज-व्यवहारातही दिसत नाही. उच्चवर्गीय व उच्चवर्णीय स्त्रियांसाठी 'आपण पुरुषसत्ताकतेचे 'बळी' आहेत'; आणि दलित पुरुषांना 'आपण जातीव्यवस्थेचे बळी आहोत' ही भावना त्यांचे अस्तित्व भान घडवणारी मध्यवर्ती विचारप्रणाली वाटते, असे त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांवरून दिसते.

दलित स्त्रिया आत्मचरित्रे लिहितात तेव्हा त्यांची भूमिका निराळी दिसते. दलित स्त्रियांची अनेक आत्मकथने आज मराठीत आहेत. बेबी कांबळे यांच्या १९८४ साली प्रकाशित झालेल्या जिणं आमुचं पासून ते उर्मिला पवारांच्या २००१ सालच्या आयदानापर्यंत (आणि नंतरही) अनेक दलित स्त्रियांनी आपली आत्मचरित्रे लिहिली आहेत. शांताबाई दाणींचे 'रात्रंदिन आम्हा...', कुमुद पावडेंचे 'अंतस्फोट', मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे', शांताबाई कांबळेंचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', जनाबाई गिर्हे यांचे 'मरणकळा', विमल गोरे यांचे 'तीन दगडांची चूल' इ. नागपूर-वर्ध्यापासून सांगली-कोल्हापूरपर्यंत आणि कोकणपट्टीपासून ते मुंबईपर्यंत महाराष्ट्राच्या अक्षांशरेखांशात पसरलेल्या महार, गोपाळ, गोंधळी, डोंबारी अशा विविध जाती-जमातींमधील दलित स्त्रियांनी आत्मकथने लिहिली आहेत. महाराष्टातील आत्मकथनपर निवेदनपरंपरेत ही आत्मचरित्रे म्हणजे मैलाचे दगड मानायला हवीत. या ठिकाणी मला एक गोष्ट स्पष्ट करायला हवी: प्रत्येक दलित स्त्री आत्मचरित्राबद्दल मी बोलणार नाही, तर त्यातल्या आत्मभानाबद्दल मांडणी करणार आहे.

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांमधली बाई एक लढाऊ समज घेऊन आलेली दिसते. ही समज तिच्या सभोवतालच्या जगण्याच्या संघर्षातून तयार होते, तिच्या जातीच्या बरोबर तिच्या तादात्म्यातून तयार होते आणि त्याचबरोबर जात्यंताशिवाय दु:खांत नाही आणि मानुष जीवनात जीवनात जगता येणार नाही, या आंबेडकरी आणि बुद्धवादी विचारांच्या मुशीतूनही ती तयार होते. या सर्व स्त्रियांचे लिखाण एका क्रांतिकारी उर्जेने भारलेले आहे. ही उर्जा या आत्मभानाचा लुघत्तम साधारण विभाज्य आहे. आपण या अमानुष समाजात बदल घडवून आणणाऱ्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी जाग्या झालेल्या परिवर्तनाच्या क्रांतीशिवाय आहोत, अशी भूमिका असलेले हे आत्मभान आहे. आपल्या बळी असणाच्या, नि:सत्व करून सोडणाऱ्या, (स्त्री म्हणून, श्रमिक म्हणून आणि खालच्या जातीच्या आहोत अशा) तिहेरी दुय्यमत्वाच्या भावनेच्या अंकित राहून हे लिखाण झालेले नाही. 'जग बदल घालुनी घाव, गेले सांगून मला भीमराव' असे म्हणत समाज बदलायला पदर बांधून उठलेल्या रणरागिणीचा लढाऊ बाणा हा या आत्मचरित्रांचा कणा आहे.

हे आत्मभान नेमक्या कोणत्या प्रकारची राजकीय समज दाखविते? दलित स्त्रियांच्या आत्मचरित्र लिहिण्याच्या मागील प्रेरणा पाहिल्या तर असे दिसते की या स्त्रिया आपल्या जातीचे 'घडणे' विस्ताराने मांडतात. उदाहरणार्थ मुक्ता सर्वगौड यांना जेव्हा यदुनाथ थत्ते यांनी आत्मचरित्र लिहायला सांगितले तेव्हा त्यांना हसू आले. 'स्वत:चे आयुष्य वाचकांच्या समोर प्रदर्शित करणे हे आत्मचरित्राचे कार्य नाही तर आपल्या व्यक्तिगत आयुष्यातल्या अनुभवांच्या मांडणीतून दलित समाजाचे आयुष्य चिकित्सक नजरेतून समाजासमोर मांडणे' हा त्यांचा हेतू आहे. कुमुद पावडेंना आपले लिखाण आत्मचरित्रात्मक वाटत नाही, तर 'जुलमी जाती/धर्मव्यवस्थेची प्रखर टीकात्मक मांडणी' वाटते. बेबी कांबळे यांचे जिणं आमुचं हे आत्मचरित्र त्यांनी मुळात का लिहिले यामागची ऐतिहासिक कारणमीमांसा देताना त्या म्हणतात: माझे लेखन हे माझ्या लेकी-सुना, पोरीबाळी आणि पुढच्या पिढ्यांसाठी आहे. आपण महार असण्याबद्दल लाज शरम वा कमीपणा का बाळगायचा? आपल्या महार रक्तातले क्रांतिकारी सत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने कसे जागे झाले, प्रस्थापितांबरोबर कसे लढू लागले. याच्या प्रेरक आणि स्फूर्तिदायक आठवणी मला पुढच्या पिढ्यांना सांगायला हव्यात, म्हणजे हे तेजही एका पिढीपासून पुढच्या पिढीपर्यंत संक्रमित होईल. इथे आत्मचरित्रांमागच्या नव्या भूमिका, एक नवी विजिगीषु परंपरा आणि परिवर्तनाच्या लढ्यातून स्त्रियांना आलेले स्वत:च्या स्त्री पणाचे क्षमतेचे ओजस्वी भान अख्ख्या समाजाला घेऊन व्यक्त होते. लढ्याची ऐतिहासिक आठवण तरुण दलित पिढीच्या स्मृतीमध्ये ठामपणे टिकवून ठेवली तरच लढाऊ परंपरा जिवंत राहील ही जिद्द प्रखरपणे व्यक्त होते.

आणखी एक आत्मचरित्रात न आलेली पण त्यांच्या मुलाखतीमध्ये त्यांनी सांगितलेली एक बाब प्रतिकारी सांस्कृतिक जाणिवेची निदर्शक म्हणून मला आपल्यासमोर ठेवणे मला फार महत्वाचे वाटते. आपल्याला माहित आहे की, बेबीताई आपले आत्मचरित्र सतत सतरा-अठरा वर्षे लिहित होत्या. (हे दमनाचे एक उदाहरणच आहे. कारण आपण लिहीतो हे दुसऱ्याला कळले

तर बाई लिहीते म्हणून मुलांपासून शेजारपाजाऱ्यांपर्यंत नावे ठेवून घ्यावी लागतील, नाचक्की होईल, कदाचित पतीचा मारही खावा लागेल अशी भीती!) तर ते त्यांनी मुळात लिहायला का घेतले?

त्यांचे किराणा मालाचे दुकान होते. आणि मोकळ्या वेळात, गिऱ्हाईके नसताना, रद्दी कागद वाचत बसणे हा त्यांचा छंद. रद्दीत जुनीपानी गोष्टींची पुस्तके येत. अशीच एकदा त्यांनी पुस्तकात तुळशीविवाहाची कथा वाचली. कृष्णभक्तीत हरवून गेलेल्या तुळशीच्या आपल्या उपास्य दैवताबरोबर झालेल्या विवाहाची गोष्ट वाचून त्या भयंकर अस्वस्थ झाल्या. हे खरे नाही; खरी गोष्ट वेगळीच आहे आणि ती भटाबामणांनी दडपून टाकून त्यावर हे कृष्णभक्तीचे खोटे अवडंबर रचले आहे म्हणून मला ते लिहिले पाहिजे, असे म्हणून त्या आपल्या आठवणीतल्या गोष्टी लिहित्या झाल्या.

तुळशी ही मुळातली वृंदा. जालंदर नावाच्या एका शूरवीर आणि न्यायी दलित राजाची लाडकी राणी. जालंदराने राज्य उत्तम चालवले होते हे देवांना सहन होईना. म्हणून त्यांनी त्याच्याशी युद्ध आरंभले. पण त्याचे शौर्य आणि तिचे प्रखर पातिव्रत्य यांच्यामुळे त्याचा पराभव करणे देवांना अशक्य झाले होते. तिच्या लहानपणी भूलथापा मारून नारदाने तिला एक विष्णूमूर्ती दिली होती आणि हिची पूजा कर म्हणून सांगितले होते. जालंदराला हरवायचे असेल तर तिचे पातिव्रत्य भंग करायला हवे असा विचार करून विष्णू तिच्याकडे जालंदराच्या रूपात गेला आणि आपल्याबरोबर देवाकडून असे कपट होईल याची सुतराम शंका नसलेली ती नेक स्त्री त्याला बळी पडली. त्याच क्षणी जालंदराचे मस्तक तिच्या मांडीवर येऊन पडले. तिच्या लक्षात आपली फसवणूक आली आणि ती संतापली. मग विष्णूने तिला 'आशीर्वाद' दिला की 'यापुढे तू कुमारी राहशील आणि तुझे लग्न दरवर्षी माझ्या कृष्ण अवताराबरोबर होईल.' म्हणून तुळशी विवाह होतो आणि कृष्णाजवळ सागरगोट्याच्या रूपाने जालंदराचे मस्तकही साक्षीला ठेवलेले असते. शिवाय वृंदेचे स्थान घरात नाही तर बाहेर, म्हणून तुळस दाराबाहेर असते. म्हणजे फसवणूक, दांभिक कपट आणि अवहेलना अशी तिहेरी अनीती वाट्याला.

'आपल्या भोवतालच्या वातावरणातले हे नीच सांस्कृतिक सत्ताकारण आपल्याला लक्षात घेतले पाहिजे आणि खरा इतिहास स्मृतीत जागविला पाहिजे अशी ही भूमिका आहे. ती दलित स्त्रीवादी जाणीव आहे. ही सांस्कृतिक-राजकीय जिद्द घेऊन त्यांनी लेखनाला सुरुवात केली. 'माझे दु:ख माझे व्यक्तिगत नाही तर माझ्या समाजातल्या लोकांचे आहे, ते जातीव्यवस्थेने लादलेल्या गुलामगिरीच्या व्यवहारातून व मानसिकतेतून तयार झाले आहे. म्हणून गुलामगिरीव्यतिरिक्त दुसरे हाती काही नसणार आपला पुरुषही आपल्यावर अत्याचार करायला प्रवृत्त होतो' अशी पुरुषसत्ताकतेची समज आहे, पण त्या अन्यायाचा शबल स्वीकार नाही; तर हे बदलायला हवे ही प्रेरणा त्यात आहे.

आपल्या समाजाच्या या अवस्थेतून आपल्याला बाहेर काढणारी चीज आहे शिक्षण; आणि एकूण एक दलित स्त्रियांच्या आत्मभान जागृतीत शिक्षण हा घटक फार महत्वाचा आहे. (हेच १९व्या शतकातल्या स्त्रियांच्या बाबतीतही खरे आहे. पण आधुनिकतेने त्यांना शिक्षणाची दारे खूप अगोदर उघडी केली होती.) दलित स्त्रियांना हे दालन खुले होण्यासाठी शाहू, फुले आणि आंबेडकर असूनही शतकभर वाट पहावी लागली. जनाबाई गिर्हे वडिलांच्या जिद्दीमुळे शाळा शिकल्या; जातीतील स्त्रियांच्या विरोधाला न जुमानता ती बिकट वाट त्यांनी चोखाळली, शांताबाई कांबळेच्या आई मरताना त्यांच्या वडिलांना मुलीचे शिक्षण पूर्ण करा असे सांगून गेल्या. उर्मिला पवारांना प्रथम त्यांच्या वडिलांनी आणि म्हणून नंतर आईने शाळेत जाण्याची सक्ती केली. (उर्मिला पवारांच्या आईने आपल्या पोरीचे शिक्षण अवघड करणाऱ्या एका मारकुट्या मास्तराला भर रस्त्यात शिकवलेला 'धडा' तर शिक्षणशास्त्राच्या सर्व पाठ्यपुस्तकांमधून लावावा इतका उत्तम आहे!)

या सर्व आत्मचरित्रांमधून विशेषत: स्त्रियांची स्वत:च्या, आणि आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाबाबतची ओढ उल्लेखनीय आहे. प्रतिकाराची विवेकनिष्ठ उर्जा तयार करणारे शिक्षण हे उत्तम इंधन आहे, हे त्या जाणतात. अंधश्रद्धा, खोट्या धर्मकल्पना, अन्याय्य रूढी आणि प्रस्थापितांना आव्हान देण्यासाठी शिक्षणाला पर्याय नाही. अर्थात हे संक्रमण सहजगत्या झालेले नाही. जवळपास प्रत्येक स्त्री दलित आत्मचरित्रात शिक्षण, स्त्रिया, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, खोट्या धर्मकल्पना, अन्याय रुढी आणि त्याने मनात ठोकून ठाकून रुजवलेले विटाळ कल्पनांचे, शुद्धातशुद्धतेच्या कल्पनांचे भयावह जाळे, यांबद्दलच्या समाजांतर्गत झडलेल्या चर्चा नोंदविल्या आहेत. मानसिक गुलामगिरी तोडणे सोपे नाही, पण स्त्रियांनी ते आव्हान पेललेले आणि तडीस नेलेले दिसते. त्यातल्या अडचणींवर मात करण्यासाठी शोधलेले मार्गही खरोखरी प्रेरक आणि अंजन घालणारे आहेत. कणगीतले दाणे विकून, उपाशी राहून, नवऱ्याचा मार खाऊन, समाजाकडून झालेल्या अपमानांना पाठीमागे टाकत बायांनी पोरांना शिकविले.

भूक, उपासमार, जातीच्या श्रमविभागातले विषमतेचे सत्ताकारण, बायकांच्या वाट्याला आलेले अविरत काम, हिंसाचार आणि वंचना, पोलीस आणि वरिष्ठ वर्गीय यांच्याकडून सातत्याने होणारे आरोप आणि अत्याचार, राजकीय नेत्यांच्या तोंडच्या लोकशाहीच्या/समानधिकारांच्या मोहक शब्दांच्या अवगुंठनामागले सत्ताबाज कावे... याविरुद्ध लढण्याचा एल्गार करताना या स्त्रिया या साऱ्या शर्मनाक बाबी लेखनाच्या वेशीवर टांगतात.

पण सर्वात महत्वाचे म्हणजे दलित स्त्रियांच्या दृष्टीकोनातून भारतात स्वातंत्र्योत्तर काळात आलेली आधुनिकता नेमकी कशी आहे, याचे विदारक चित्रण स्त्री दलित आत्मचरित्रांमधून येते. बौद्धपूर्व बालपणीचा सुखाचा नसलेला आणि तरीही ओठांवर हसू आणणारा काळ, लहान मुलांचे खेळ, लग्नाच्या वेळचे उखाणे, गमतीजमती, खाण्यापिण्याच्या जुन्या सवयी आणि नव्या रीती. अन्नाची पूर्वी नसलेली व आता असलेली उपलब्धता, भूकेचा सामना करण्याचे विविध मार्ग, कपडे आणि पेहरावात व एकूणच राहणीमानात झालेले बदल, लैंगिकतेच्या कल्पना, कुटुंबांतर्गत हिंसाचाराचे बदललेले रूप, नागरी जीवनात झालेले परिवर्तन, खेडी सोडून शहराकडे आलेल्या माणसांना मुंबईच्या बकाल वातावरणात रहाताना कराव्या लागणाऱ्या विविध तडजोडी, आणि अंतर्भावांच्या-बहिष्कृतींच्या नवनव्या क्षेत्रव्यूहांचे पदापदी येणारे आणि चक्रावून टाकणारे प्रत्यंतर! याचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण उर्मिला पवार आणि इतर अनेक दलित स्त्रिया करतात.

आधुनिक काळात जात सार्वजनिक जीवनातून वरकरणी अदृश्य आणि अलगद 'खाजगी' झाली. पण तिचे आर्थिक दमनाच्या संरचनेशी असलेले नाते अधिक गडदही झाले. बकाल झोपडपट्ट्यांत गटारांच्या कडेने रहाणारी, कामगार म्हणून राबणारी, भांडवलशाहीच्या विक्राळ चक्रात भरडून निघणारी माणसे आणि झपाट्याने संघटित क्षेत्रांमधून असंघटित क्षेत्रात फेकलेल्या आणि आता व्यक्तिगत पातळीवर घरगुती व्यवसाय फक्त करू शकणाऱ्या स्त्रिया हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

सांस्कृतिक अस्मितेच्या राजकारणाचे भांडवल करणाऱ्या पुढारी मंडळींच्या नजरेस ते पडत नाही. चळवळींनी मोठ्या अभिनिवेशाने आणलेल्या राजकारणातून दलित स्त्रियांचे सीमांतीकरण होणे हे अंतिमत: घातक आहे. मात्र तरीही दलित स्त्रिया आपली जिद्द सोडत नाहीत. जातीला 'खाजगी'

जगाच्या पडद्याआड नजरअंदाज करणारे तथाकथित उच्चवर्णीय आणि 'पूर्वाश्रमीच्या कनिष्ठ जातीय पण आता 'सुधारलेल्या' मंडळींचे कसब त्या 'सार्वजनिक' जगाच्या वेशीवर टांगतात. आणि त्यातल्या राजकारणाचे वाभाडे काढतात. स्वभाषेची लाज न बाळगता तिला अभिमानाने सांस्कृतिक व्यवहारात प्रस्थापित करतात. मात्र त्याच वेळी कौटुंबिकतेच्या क्षेत्रव्यूहात नामकरण, मंगळसूत्र आदि मार्गाने येणाऱ्या तथाकथित पितृसत्ता पुन्हा रुजविणाऱ्या 'सुधारणा', धर्माचे/विधींचे नव्या रुपातले जुने ढाचे आपल्याला पुन्हा पुन्हा त्याच भीषण चक्रात तर ढकलणार नाहीत याची रास्त भीतीही त्या नोंदवतात.

इथे जाता जाता एका बाबीचा उल्लेख करायला हवा. नरेंद्र जाधवांच्या आत्मचरित्रात त्यांच्या अमेरिकेतल्या दिवाणखान्यात एकेकाळी बाबासाहेबांच्या आदेशानुसार टाकून टाकून दिलेले जुने देव पुन्हा मांडणारी कन्या आहे आणि तिला ते देव आपल्याकडे कनवाळू नजरेने पाहताहेत असे वाटते. अर्जुन डांगळे यांच्या पुस्तकासाठी लिहिलेल्या लिखाणात बाबुराव बागुलांनी असे म्हटले आहे की, 'भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे रूपांतर एका नव्या मिथ्यकथेमध्ये करण्यात आले आणि त्याच्या परिणामी परिवर्तनाच्या इतर साऱ्या चळवळी दुय्यम ठरवल्या गेल्या.' आता बाबासाहेबांची जात्यंताची चळवळ पुन्हा नव्याने दुय्यम ठरते आहे काय? जागतिकीकरणाच्या काळात मानवी हक्कांच्या परिभाषेमागे लपूनछपून तेच छदमी राजकारण पुन्हा परत वर येत नाही ना? असा प्रश्न विचारायची वेळ आली आहे. एखाद्या जंगलातल्या सावजावर उडी मारायला दबा धरून बसलेल्या श्वापदासारखी जात लपून बसलेली आहे, हा उर्मिलांनी दिलेला इशारा अर्थगर्भ होतो.

महाराष्ट्रीय दलित स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची तुलना अन्य भाषांमधील आत्मचरित्रांशी केली तर काय दिसते? बामा यांचे करक्कू (१९९२) हे पहिले दलित स्त्रीआत्मचरित्र महत्वाचे आहे. दलित ख्रिश्चन बाईच्या नजरेतून बामा यांनी केलेली चर्चच्या धार्मिक 'राजकारणाची चिकित्सा', तमिळ व अन्य कोणत्याही भाषेत इतक्या समर्थपणे पहिल्यांदाच आली. हीन समजल्या गेलेल्या, 'परायार' या खालच्या जातीत जन्माला आलेल्या या मुलीला शिक्षणाचा मार्ग चर्चने दाखविला खरा. पण जेव्हा ख्रिस्ताने दाखविलेल्या समाजसेवेच्या मार्गावर 'नन' बनून बामाने पहिली पावले टाकायला सुरुवात केली, तेव्हा तिच्या लक्षात आले की याही धर्माच्या व्यवहारात दलितांबद्दलचा आकस आणि तिरस्कार ओतप्रोत भरला आहे. चर्च दलितांना ख्रिस्ताच्या शिकवणीनुसार विनम्र, गरीब, सोशीक वगैरे बनायला सांगते ते त्यांच्यावर दंडेली करता यावी म्हणून! क्षणोक्षणी उपेक्षा आणि अवहेलना! दलितांनी चर्चच्या कॉयरमध्ये गायचे नाही, पोटभर खायचे नाही, त्यांनी उच्चवर्णीय ख्रिश्चनांपासून वेगळे बसायचे! इतकेच नव्हे तर मेल्यानंतर त्यांच्या मृतदेहांना उच्चवर्णीय ख्रिश्चनांच्या दफनभूमीत पुरायचेही नाही – तात्पर्य, येशू ख्रिस्ताच्या सगळ्या रॅडिकल शिकवणुकीला चर्चने वाटाण्याच्या अक्षता कशा लावल्या आहेत याचे अनुभवसिद्ध कथन बामाने केले.

ख्रिश्चन चर्चच्या दुटप्पी व्यवहाराची इतकी परखड आणि स्वानुभावावर आधारित टीका पचवणे चर्चला चांगलेच जड गेले. कारण बामाचा आवाज दाबून टाकण्याचे भरपूर प्रयत्न झाले. मात्र न डगमगता नेटाने दलित समाजाच्या आणि विशेषत: दलित स्त्रियांच्या हक्कांसाठीचा आपला लढा चालू ठेवणारी ही लेखिका आहे. मात्र मराठी दलित स्त्रीच्या राजकीय जाणिवेचे आणि संघटनाचे पाठबळ तिच्याशी नाही. तरीही डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या आणि लढ्याच्या मुशीतून घडलेल्या मराठी दलित स्त्रियांच्या लिखाणातली धर्मचिकित्सेची धग मात्र आपल्याला तिच्या लिखाणात जाणवते. 'सांगाती' आणि 'वन्मम' या तिच्या पुढच्या दोन पुस्तकांमध्ये (या दोन्ही कादंबऱ्या आहेत) बामाने दलित समूहांमध्ये उच्चनीचतेच्या उतरंडीने साधलेल्या दुही-फुटीच्या राजकारणाची, दोन्ही जमातीतील स्त्रियांच्या वाट्याला आलेली पुरुषसत्ताक हिंसाचाराची परखड चिकित्सा केलेली आहे. त्यातून आपल्याला केवळ डॉ. आंबेडकरांचाच नव्हे तर आयोतीदास आणि पेरियार या दाक्षिणात्य विचारवंतांचा प्रभावही दृग्गोचर होतो.

तामिळमध्ये 'Viramma : Life of a Dalit' हे जोसॅन रॅसिन आणि जीन लुक रॅसिन यांनी शब्दबद्ध केलेले वीराम्मा या दलित स्त्रीचे आत्मकथन आपल्याला दलित स्त्रियांच्या आवाजाला अधिकृत परिमाण मिळवून देताना दिसते. दारिद्र्यात पिचणाऱ्या दलित स्त्रियांचे जीवनवस्त्र जन्म, मृत्यू, लैंगिक व्यवहार आणि काबाडकष्ट या धाग्यांनी कसे विणले आहे याचे प्रत्ययकारी पण बरेचसे 'अराजकीय' चित्रण त्यात आहे.

आणि खास उल्लेख करायला हवा तो तामिळमध्येच लिहिणाऱ्या शिवकामी या लेखिकेचा. तिची 'पजियाना काजिदालुम' ही कृती या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. त्यांनी स्वत:च तिचे इंग्रजी भाषांतर 'The Grip of Change' या नावाने केलेले आहे (२००६). तामिळनाडूतील दलित स्त्रियांच्यामध्ये शिक्षणाबद्दल, काम करण्याच्या अधिकारांबद्दल, त्यांना आपल्या जमातीच्या आणि अन्य उच्चवर्णीय समाजाकडून मिळणाऱ्या अन्याय-अत्याचारांबद्दल, जी नवी जाणीव जागृती झालेली आहे; तिचे अस्वस्थ करणारे विवेचन त्यात येते. शिक्षणाने आलेले अस्मितेचे भान पुरेसे आहे काय? आधुनिकतेच्या नावाखाली आणि वातावरणात लिंगभावाच्या राजकारणामुळे स्त्रियांना शोषणाच्या नवनव्या साऱ्यांना कसे सामोरे जावे लागते? जातीजातींच्या अस्मितेखाली दलित स्त्रियांची मानसिकता कशी बळी जाते. भरडली जाते? हे प्रश्न विचारणे सोपे नाही. आणि त्यांची उत्तरे देणेही. परंतु हे अवघड आव्हान लेखिकेने पेलले आहे. जात्यांतर्गत लिंगभेदभाव, सामाजिक व्यवहारांमधील अन्याय, स्त्रियांनी समतेसाठी चालवलेले सांस्कृतिक लढे, दलित स्त्रियांचे साहित्यात स्थान, विवाहसंस्था, दलित स्त्रीमुक्तीवाद, मानवी हक्क आणि अधिकार ही आशयसूत्रे तामिळमध्ये लिहिणाऱ्या दलित स्त्रियांच्या आत्मचरित्रात्मक लेखनात आढळतात.

आता हे सर्व म्हटल्यानंतर आपण लक्षात घ्यायला हवे की आत्मचरित्रांची परंपरा आणि तिचे निकष ठरवताना दलित स्त्रियांनी सामोऱ्या आणलेल्या निवेदनपद्धती, त्यातले ताणेबाणे, आधुनिकतेशी असलेले त्यांचे गुंतागुंतीचे नाते व या साऱ्यांच्या मुळाशी असलेले त्यांचे राजकीय भान त्यांना त्यांचे वेगळेपण बहाल करते, सार्वजनिक विचारव्यूह आणि कुटुंब, धर्म, शिक्षण या आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी त्यांनी वापरलेले निवेदनबंध आपल्याला अन्य स्त्रिया वा पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांमध्ये दिसत नाहीत. किंबहुना त्यांची आत्मचरित्रे हा म्हणून इतिहासलेखनाचाच एक प्रकार होय असे म्हटले पाहिजे.

त्यांच्या सत्यदिग्दर्शनातून लढाऊ आणि गौरवशाली इतिहासाची पाने लिहिली जातात. इतिहासाच्या सामूहिक विस्मरणाला त्या आत्मचरित्रांमधून सांगितलेल्या खाजगी वृत्तांतांमधून सामूहिक जागृतीचा उतारा देतात आणि एकाच वेळी 'स्व'भान आणि समूहभान यांचा एकमेळ साधतात. 'व्यक्तीगत' आणि 'खाजगी' अशा बाबी देखील ऐतिहासिक दस्ताऐवज बनतात ते यांमुळेच. त्यांनी वर्णन केलेली जातीव्यवस्था, समूहांचे वर्तनव्यवहार, आयुष्य जगण्याच्या निरनिराळ्या पद्धती आणि प्रतिकाराच्या उर्जेने त्यात घडवून आणलेले बदल, (उदाहरणार्थ, नागपूर अधिवेशन आणि त्यानंतरची दलित मानसिकता आणि व्यवहार) फुटकळ आणि संधीसाधू राजकारण्यांच्या /पुढाऱ्यांच्या संघटना आणि आंदोलने, त्यातून झालेले ध्रुवीकरण, (मध्यम जातींचे भगवेकरण, आणि नवबौद्ध एकटे पडणे), याबाबतची अस्वस्थता, यांवर या आत्मचरित्रांमधून प्रकाशझोत पडतो. म्हणून त्यांना ऐतिहासिक दस्ताऐवज म्हटले पाहिजे.□□□